SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
शू पॅलेस सारडागल्ली, अ.नगर मो : 9881531536

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ३१.०७.२०२६ | अंक नं. १०४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिळ असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल!
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

रु. 2000 पासुन बेबी टॉप्स / 1000 पेक्षाही अधिक डिझाईन्स
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ ९९९/-*

# राज्यातील २२ जिल्हा परिषदांच्या रखडलेल्या निवडणुका डिसेंबरमध्ये होण्याची शक्यता

## ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेमुळे राजकीय समीकरणे बदलणार

मुंबई – राज्यात गेल्या काही काळापासून प्रलंबित असलेल्या २२ जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचा मार्ग अखेर मोकळा होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा पाळून निवडणुका घेण्याची पूर्ण तयारी दर्शवली आहे. त्यामुळे डिसेंबर महिन्यात या निवडणुका पार पडू शकतात. जिल्हा परिषदांसोबतच मुदत संपलेल्या १०५ नगरपंचायती आणि सुमारे १२ हजार ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा बारही याच वेळी उडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

५० टक्यांची घटनात्मक मर्यादा ओलांडली गेल्यामुळे राज्यातील २२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका रखडल्या होत्या. यापूर्वी जानेवारी महिन्यात १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका पार पडल्या होत्या. आता ५० टक्के मर्यादेचे काटेकोर पालन करूनच निवडणुका घेतल्या जाणार असल्याने यापूर्वी जाहीर झालेल्या आरक्षणात मोठे बदल होतील आणि एकूण आरक्षित जागांची संख्या कमी होणार आहे.

राज्यात ज्या २२ जिल्ह्यांमध्ये निवडणुका रखडलेल्या आहेत त्यामध्ये अहिल्यानगर, बीड, जालना, नांदेड, हिंगोली, पालघर, ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली यांचा समावेश आहे.

### सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाकडे लक्ष

एसआयआरची प्रक्रिया पार पडल्यानंतर डिसेंबर महिन्यात या निवडणुकांचा बिगुल वाजू शकतो. राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात सकारात्मक भूमिका मांडल्यामुळे आता न्यायालय नेमका काय अंतिम आदेश देते, याकडे सर्व राजकीय पक्ष, उत्सुक उमेदवार आणि मतदारांचे लक्ष लागले आहे.

# शनि महाराज मंदिरातील दानपेटी चोरट्यांनी पळवली

## माळीवाड्यातील बारातोटी कारंजा परिसरातील घटना

नगर–शहर आणि परिसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले असून, आता थेट देवाच्या दानपेटीवरच चोरांनी डोळा ठेवल्याचा प्रकार समोर आला आहे. अहिल्यानगर शहरातील बारातोटी कारंजा परिसरातील केव्हळ हॉस्पिटलसमोर असलेल्या शनि महाराज मंदिरातून अज्ञात चोराने दानपेटी पळवून नेली आहे.

याबाबत महेश बाळासाहेब चिंतामणी यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. २९ जुलै रोजी सकाळी पावणेदहा ते दहा वाजेच्या सुमारास ही घटना घडली. अज्ञात चोराने मंदिरात घुसून सुमारे ५०० रुपये किमतीची स्टीलची चौकोनी दानपेटी चोरून नेली. या दानपेटीत अंदाजे ६००० ते ६५०० रुपयांची रोकड आणि विविध मूल्यांची नाणी होती. या घटनेमुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीची अद्याप ओळख पटलेली नाही. कोतवाली पोलीस ठाण्याचे पो.नि.नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार राजेंद्र औटी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

शहर परिसरात सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोराचा शोध सुरू आहे.

# संभाजीनगर-अहिल्यानगर-पुणे महामार्ग सहापदरी करा

## खासदार नीलेश लंके यांची केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी

नगर – खासदार नीलेश लंके यांनी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३–एफ (छत्रपती संभाजीनगर–अहिल्यानगर–शिरूर–पुणे) या सुमारे २२० किलोमीटर लांबीच्या महामार्गाचे सहापदरी सिमेंट–काँक्रीट मार्गात रूपांतर करण्याची मागणी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी नवी दिल्लीत मंत्री गडकरी यांची भेट घेऊन या महत्त्वाच्या मार्गाच्या सर्वांगीण विकासासाठी तातडीने प्रशासकीय मंजुरी देण्याची विनंती केली आहे.



संभाजीनगर–अहिल्यानगर–पुणे महामार्ग सहापदरी करा याबाबत खा. निलेश लंके यांनी ना. नितीन गडकरी यांची भेट घेतली.

खासदार लंके यांनी या संदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पुणे हे राज्यातील औद्योगिक, शैक्षणिक, वैद्यकीय व आध्यात्मिक केंद्र असून मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातून दररोज हजारो नागरिक या मार्गाने प्रवास करतात. मात्र, शिरूर ते छत्रपती संभाजीनगर दरम्यानचा राष्ट्रीय महामार्ग अनेक ठिकाणी अरुंद, खड्डेमय व जीर्ण अवस्थेत असल्याने वाहतूक कोंडी, अपघात आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.शिरूर–पुणे फ्लायओव्हर प्रकल्पाला गती दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार व्यक्त करताना, उर्वरित संपूर्ण महामार्गाचाही विकास त्याच धर्तीवर करण्यात यावा, अशी मागणी खासदार लंके यांनी केली आहे.

या महामार्गावर श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर, श्री ज्ञानेश्वर माऊली मंदिर (नेवासा), शिर्डी, देवगड, थेऊर गणपती, रांजणगाव गणपती यांसारखी प्रमुख तीर्थक्षेत्रे असून वाळूज, नेवासा, अहिल्यानगर, सुपा, रांजणगाव, शिक्रापूर, चाकण आणि तळेगाव ही महत्त्वाची औद्योगिक केंद्रेही या मार्गावर आहेत. त्यामुळे या महामार्गाचे सहापदरीकरण झाल्यास धार्मिक पर्यटन, उद्योग, शेतीमाल वाहतूक, गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

बीराष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३–एफच्या संपूर्ण २२० किलोमीटर मार्गाचे सहापदरी सिमेंट–काँक्रीटीकरण, आवश्यक ठिकाणी फ्लायओव्हर उभारणी व इतर पूरक सुविधांच्या कामांना प्राधान्य देऊन तातडीने मंजुरी द्यावी, अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे. त्यांच्या या मागणीमुळे मराठवाडा, अहिल्यानगर आणि पुणे या तीन महत्त्वाच्या विभागांतील दळणवळण अधिक सुरक्षित, जलद आणि सक्षम होण्यास मदत होणार आहे.

# सोने आणि चांदीच्या किंमतीत घसरण कायम

दिल्ली – सोने आणि चांदीच्या किंमतीतील घसरण थांबायचे नाव घेत नाही आहे. ३१ जुलैच्या सकाळी सोने–चांदीच्या फ्युचर्स दरांत घसरणीचा कल कायम राहिला आहे तर, सराफा बाजारातील किमतीही सपाट व्यवहार करत आहेत. याशिवाय एप्रिल–जून तिमाहीत भारतात सोन्याची मागणी वार्षिक तुलनेत सहा टक्क्यांनी घटली झाल्याचेही समोर आले आहे.

सोन्याच्या वापराच्या मूल्यात ५०% लक्षणीय वाढ होऊनही घट नोंदवली गेली. वर्ल्ड गोल्ड कौन्सिलच्या अहवालानुसार गेल्या वर्षी याच कालावधीत सोन्याची एकूण मागणी १३९.७ टन होती, तर चालू वर्षात सोन्याची मागणी ६५० ते ७५० टन दरम्यान राहण्याचा थ्रऊउ चा अंदाज आहे. विक्रीत झालेली घट, सीमा शुल्कातील वाढ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सोन्याची खरेदी कमी करण्याचे केलेले आवाहन यामागील प्रमुख कारणे असल्याचे मानले जात आहेत.

अहिल्यानगर मधे प्रथमच होत आहे.
URJA THEATRE FESTIVAL
Children's Theatre Festival
For age group: 3 years +
Story Quilt 1 August 2026
12 September 2026 Mister Jeejeebhoy and the Birds
10 October 2026 गुबु गुबु
5 December 2026 Big Bad Wolf
9 January 2027 When Walls Dance
13 February 2027 गोष्टींची गोष्ट
गोल्ड पास ₹2500 | सिल्वर पास ₹1500
स्थळ - ऊर्जा रंगालय, केडगाव देवी रोड अहिल्यानगर.
अधिक माहिती साठी संपर्क - 8600244000

महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त कापड मॉल महावीर मॉल
स्वस्त म्हणजे नक्की काय असतें..?
रेनकोट आणि छत्री महोत्सव
पावसाळा सुरू होण्यापूर्वी पावसाळ्याची तयारी करूया
झील आणि वर्षा रेनकोटवर सरसकट 20% डिस्काउंट
रेनकोट खरेदी करा आणि अधिकचा डिस्काउंट मिळवा..
सर्व फ्रेश स्टॉक, नवीन डिझाईन रेडी स्टॉकमध्ये उपलब्ध
* सर्व शालेय मुलांचे सॅक वाले रेनकोट मिळतील.
* लेडीज रेनकोट मिळतील.
अधिक माहितीसाठी भेट द्या.. श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

CCTV CAMERA बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल
ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
Cell : 98222 94622
9422087757
www.mandarmulay.com

अहिल्यानगरकर !! साक्षिदार व्हा
सर्वात मोठ्या पैठणी आणि साडी महोत्सवाचे
सोनाली पैठणी अँड सिल्क साडी (येवला)
23 जुलै ते 2 ऑगस्ट 2026
सकाळी 10 ते रात्री 10 वाजेपर्यंत
किंमत ₹500 पासून ते ₹2 लाखांपर्यंत
आजच भेट द्या !!
शेवटचे फक्त 2 दिवस बाकी !!
मान्सून मध्ये मिळवा डिस्काउंट
UPTO 50%
दररोज पहिल्या 100 महिलांना ₹5000 च्या खरेदीवर चांदीची भेटवस्तू
बंधन लॉन्स, डि-मार्ट जवळ, सावेडी, अहिल्यानगर
संपर्क : 91 452 452 52

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# मुख्याध्यापकाकडून ८ वर्षांच्या बालकाला अमानुष मारहाण; गुन्हा दाखल

नगर – नगरतालुक्यातील वाळुंज परिसरातील नालंदा शाळेत एका ८ वर्षांच्या लहान विद्यार्थ्याला मुख्याध्यापकाने अमानुषपणे मारहाण करून त्याचा कान पिरगळला व हाताचा जोरात चावा घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी मुख्याध्यापकाविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मुलाचे वडील सोनल अर्जुन शेळके (वय २९, रा. बुरुडगाव रस्ता, अहिल्यानगर) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा आठ वर्षांचा मुलगा हा नालंदा शाळेत इयत्ता तिसरीमध्ये शिक्षण घेत आहे. ३० जुलै रोजी सकाळी नेहमीप्रमाणे तो शाळेत गेला असता, वर्गात दोन विद्यार्थ्यांमध्ये भांडण झाले होते. या भांडणाची माहिती लहान विद्यार्थ्याने वर्ग शिक्षिकेला दिली. वर्ग शिक्षिकेने शाळेचे मुख्याध्यापक गौतम बहादुर्गे यांना बोलावून घेतले. मात्र, मुख्याध्यापक बहादुर्गे यांनी कोणतीही शहानिशा न करता उलट तक्रार करणाऱ्या लहान मुलालाच दोषी ठरवले.

संतापलेल्या मुख्याध्यापकांनी बालकाचा कान पिरगळला आणि त्याला भयंकर भीती दाखवली. त्यानंतर बालकाला गळ्याला धरून हवेत उचलून धरले व १ ते २० आकडे मोजून खाली सोडले. एवढ्यावरच न थांबता त्यांनी लहान मुलाच्या उजव्या हाताच्या दंडावर दातांनी चावा घेतला. दुपारी घरी आल्यानंतर मुलाने घडलेला प्रकार पालकांना सांगितला. मुलाच्या हातावर काळे–निळे वळ उठून रक्त येत होते व त्याला ताप आला होता. पालकांनी तत्काळ मुलाला अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात नेऊन वैद्यकीय उपचार केले.त्यानंतर फिर्यादी सोनल शेळके यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या फिर्यादीवरून मुख्याध्यापक गौतम बहादुर्गे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ‘कर्जमुक्ती योजने’च्या पहिल्या यादीत जिल्ह्यातील १ लाख ३२ हजार शेतकरी

**आधार प्रमाणीकरण व ग्रीस्टॅक नोंदणी करण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन**

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत राज्यातील ३१ लाख कर्ज खात्यांपैकी १७ लाख खात्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली असून, अहिल्यानगर जिल्ह्यातील १ हजार ३७८ गावांतील १ लाख ३२ हजार ७३४ पात्र शेतकऱ्यांचा त्यामध्ये समावेश आहे. ३० जुलै अखेर जिल्ह्यातील सुमारे १ लाख ५ हजार शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले असून, योजनेचा लाभ मिळविण्यासाठी आधार प्रमाणीकरण (ई–केवायसी) तसेच ग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करून फार्मर आयडी प्राप्त करणे अनिवार्य आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना थकीत कर्जाच्या ओझ्यातून दिलासा देण्यासाठी तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जांपैकी ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकबाकी असलेली व ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली कर्जे विचारात घेतली जाणार आहेत. पात्र शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना एकवेळ तडजोड योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यानंतर शासनाच्या लाभासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. तसेच सन २०२२–२३, २०२३–२४ आणि २०२४–२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

राज्यातील ३१ लाख कर्ज खात्यांपैकी १७ लाख खात्यांची पहिली यादी प्रसिद्ध झाली असून, उर्वरित खात्यांमध्ये खाते क्रमांक, केवायसी किंवा अन्य तांत्रिक त्रुटी आढळल्याने माहिती पुनर्तपासणीसाठी संबंधित बँकांकडे पाठविण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील २ लाख ३३ हजार ७११ खातेदारांची माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली असून, त्यापैकी १ लाख ९२ हजार २८२ खातेदार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे तर ४१ हजार ४२९ खातेदार व्यापारी बँकांचे आहेत.

महाआयटीने विकसित केलेल्या संगणकीय पोर्टलवर २५ जुलै २०२६ रोजी जिल्ह्यातील १ हजार ३७८ गावांतील पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली असून, त्यामध्ये १ लाख ३२ हजार ७३४ शेतकऱ्यांचा समावेश आहे. यापैकी १ लाख १६ हजार ५१२ शेतकरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे असून त्यांच्याकडील थकीत कर्जाची रक्कम १ हजार ९८ कोटी ३१ लाख रुपये आहे, तर उर्वरित १६ हजार २२२ शेतकरी व्यापारी बँकांचे आहेत. या याद्या गावचावडी तसेच संबंधित बँक शाखांमध्ये प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. पहिल्या यादीत दोन लाख रुपयांपर्यंत थकबाकी असलेल्या लाभार्थ्यांचा समावेश असून, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या लाभार्थ्यांच्या याद्या साधारण १५ ऑगस्टपर्यंत टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. यादीत नाव समाविष्ट झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांनी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात किंवा बँकेत जाऊन बायोमेट्रिक पद्धतीने आधार प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. मात्र, त्यापूर्वी ग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करून फार्मर आयडी प्राप्त केलेला असणे आवश्यक आहे. फार्मर आयडी उपलब्ध असल्यासच आधार प्रमाणीकरण करता येणार आहे.

आधार क्रमांक, कर्जाची रक्कम किंवा कर्ज खात्याच्या तपशीलाबाबत असहमती असल्यास शेतकऱ्यांना आपले सरकार सेवा केंद्र अथवा संबंधित बँकेमार्फत तक्रार नोंदविता येईल. केंद्र चालक संबंधित तक्रार तालुका अथवा जिल्हास्तरीय समितीकडे पाठवून त्याची पावती शेतकऱ्यांना देतील. बँकेने अपलोड न केलेल्या कर्ज खात्यांबाबत शेतकऱ्यांनी तहसीलदार अथवा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे लेखी अर्ज सादर करावा. मृत शेतकऱ्यांच्या वारसांनी संबंधित बँकेत वारस नोंद करून कर्ज खाते हस्तांतरित केल्यानंतर आधार संलग्न करावे. त्यानंतर कर्जमुक्तीचा लाभ वारसांच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

केवायसी करताना ’नो रेकॉर्ड फाउंड’ असा संदेश आल्यास संबंधित शेतकऱ्याचा ग्रीस्टॅक क्रमांक अद्याप तयार झालेला नसण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत काही कालावधीनंतर पुन्हा प्रयत्न करावा. अडचण कायम राहिल्यास जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयात ऑफलाइन तक्रार दाखल करता येईल.

शासनाने व्यापारी बँकांमधील अनुत्पादित (एनपीए) कर्जखात्यांसाठी तडजोडीच्या रकमेत सवलत देण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार ३० सप्टेंबर २०२१ किंवा त्यापूर्वीच्या कर्जखात्यांसाठी ३५ टक्के, १ ऑक्टोबर २०२१ ते ३० सप्टेंबर २०२२ या कालावधीतील कर्जांसाठी ४५ टक्के, १ ऑक्टोबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२३ या कालावधीतील कर्जांसाठी ५५ टक्के, १ ऑक्टोबर २०२३ ते ३० सप्टेंबर २०२४ या कालावधीतील कर्जांसाठी ७० टक्के, तर १ ऑक्टोबर २०२४ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीतील कर्जांसाठी ८५ टक्के सवलत देण्यात येणार आहे.

यादीमध्ये दर्शविण्यात आलेली कर्जरक्कम आणि आधार प्रमाणीकरणाच्या वेळी दिसणारी रक्कम वेगवेगळी असू शकते. कारण यादीमध्ये दर्शविण्यात आलेली रक्कम ही शासनाच्या निर्देशानुसार सवलत वजा करून निश्चित करण्यात आलेली तडजोडीची रक्कम आहे. तसेच १ एप्रिल २०२६ नंतर संबंधित कर्जखात्यांवर व्याजाची आकारणी करण्यात येणार नाही. त्यामुळे २५ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या यादीतील दोन लाख रुपयांपर्यंतची पात्र रक्कम शासनामार्फत माफ करण्यात येणार असून, पात्र शेतकऱ्यांना कोणतीही अतिरिक्त रक्कम बँकेत भरावी लागणार नाही.

शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ मिळविण्यासाठी विलंब न करता आपले सरकार सेवा केंद्र अथवा संबंधित बँकेत जाऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे तसेच ग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करून फार्मर आयडी प्राप्त करावा. आपले सरकार सेवा केंद्रामार्फत करण्यात येणारे आधार प्रमाणीकरण पूर्णपणे विनामूल्य असून त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.



जलतरण तलावाचा वापर केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न ठेवता, त्यातून दर्जेदार जलतरणपटू घडविणे आवश्यक आहे. यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या धर्तीवर जलतरण तलाव विकसित करावा. तसेच जलतरण तलावाचे संचालन बाह्य यंत्रणेकडे सोपवून खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण उपलब्ध करून द्यावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

# नाशिक महापालिकेच्या धर्तीवर जलतरण तलाव विकसित करा

**जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या सूचना**

नगर – जलतरण तलावाचा वापर केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न ठेवता, त्यातून दर्जेदार जलतरणपटू घडविणे आवश्यक आहे. यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या धर्तीवर जलतरण तलाव विकसित करावा. तसेच जलतरण तलावाचे संचालन बाह्य यंत्रणेकडे सोपवून खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण उपलब्ध करून द्यावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

जिल्हा क्रीडा परिषदेची बैठक जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी संपन्न झाली. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी संगीता जगताप, तालुका क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, प्रा. श्रीकांत निंबाळकर, सुनील जाधव तसेच महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि शिक्षण विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा सन्मान करण्यात यावा. अशा खेळाडूंना क्रीडा पोशाखांचे वितरण करण्यात यावे. तसेच त्यांच्यासाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करावे, असे डॉ. आशिया यांनी सांगितले. त्यामुळे खेळाडूंचे मनोबल उंचावण्यास मदत होईल आणि त्यांना पुढील वाटचालीस प्रोत्साहन मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.

मागील काही वर्षांपासून खेळाडूंना क्रीडा प्रमाणपत्रे वितरित करण्याची प्रक्रिया प्रलंबित आहे. ही प्रमाणपत्रे खेळाडूंना सुलभपणे उपलब्ध व्हावीत, यासाठी स्वतंत्र संकेतस्थळ विकसित करावे. या संकेतस्थळाच्या माध्यमातून खेळाडूंना त्यांची क्रीडा प्रमाणपत्रे उपलब्ध होतील. तसेच खेळाडूंची माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक माहिती साठवणूक प्रणाली उपलब्ध करावी, असे त्यांनी सांगितले.

तालुका स्तरावरील क्रीडा संकुलांच्या प्रश्नांचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. शेवगाव व पाथर्डी येथे क्रीडा संकुलासाठी जागा उपलब्ध नसल्याची, तर राहुरी येथे जागा उपलब्ध असूनही काही अडचणी असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या ठिकाणांवरील प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढून क्रीडा संकुलांची कामे मार्गी लावावीत, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

क्रीडा संकुलांच्या विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून घेणे तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा संबंधित कार्यान्वयन यंत्रणेमार्फत ही कामे विहित मुदतीत पूर्ण करावीत. खेळाडूंना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

## जगन्नाथ ठोंबरे यांचे अल्पशा आजाराने निधन

चिचोंडी पाटील – येथील रहिवासी जगन्नाथ सोनाजी ठोंबरे (वय ८८) यांचे ३० जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. संजय ठोंबरे यांचे ते वडील होत. जगन्नाथ ठोंबरे हे चिचोंडी पाटील गावचे माजी उपसरपंच व विविध कार्यकारी सोसायटीचे सचिव होते.

## वसंतराव उगले यांचे वृद्धापकाळाने निधन

नेवासा – देवसडे येथील रहिवासी वसंतराव सर्जेराव उगले (वय ९०) यांचे ३० जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ३१ जुलै रोजी देवसडे स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

ठाणे पोलिस आयुक्त डॉ. पंजाबराव उगले व मनोज उगले यांचे ते वडील होत.

## निलिमाबाई कोठारी यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर – सिद्धीविनायक गणपती मंदिराजवळील मोरगे वस्ती, वॉर्ड क्र.७ येथील रहिवासी सौ. निमिमाबाई संजय कोठारी (वय ५६) यांचे ३१ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



संजय पुनमचंद कोठारी (खानापुरवाले) यांच्या त्या पत्नी, ललीत कोठारी यांच्या भावजई तर गणेश व रिद्धी कोठारी यांच्या त्या मातोश्री होत.

## विजय बोरा यांचे अल्प आजाराने निधन

पुणे – दापोली (पुणे १२) येथील रहिवासी सुश्रावक विजय शांतीलाल बोरा (वय ७०) यांचे ३० जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पिंपरी भातनगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले



त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नितेश बोरा यांचे ते वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# बागुलू पंडुगूनिमित्त श्रमिकनगरमध्ये पोशम्मा तल्ली; लचमम्मा तल्ली देवींच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

नगर – पद्मशाली समाजाचा पारंपरिक बागुलू पंडुगू (बागेचा सण) श्रमिकनगर, सावेडी येथे शुक्रवारी अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. श्रमिकनगर येथील शितळादेवी (पोशम्मा तल्ली) आणि लक्ष्मीमाता (लचमम्मा तल्ली) या दोन्ही मंदिरांमध्ये पहाटेपासूनच देवीच्या दर्शनासाठी, पूजा–अर्चेसाठी व पारंपरिक नैवेद्य अर्पण करण्यासाठी पद्मशाली समाजातील महिला भगिनींसह भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

या पारंपरिक यात्रा उत्सवाचे आयोजन श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्था ट्रस्ट यांच्या वतीने करण्यात आले होते. ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी यात्रेचे नियोजन व व्यवस्था उत्तम प्रकारे सांभाळल्यामुळे संपूर्ण धार्मिक सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



बागुलू पंडुगू निमित्त श्रमिकनगरमध्ये पोशम्मा तल्ली व लचमम्मा तल्ली देवींच्या दर्शनासाठी भाविकांची झालेली गर्दी. (छाया – श्रीनिवास बुरगुल)

यात्रा उत्सवानिमित्त पोतराजांच्या उपस्थितीत महिलांनी डोक्यावर आकर्षक सजविलेले बोणालू (कलश) घेऊन ढोल–ताशे आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात परिसरातून भव्य मिरवणूक काढली. अनेक महिला भगिनींनी आपल्या नवसपूर्तीसाठी डोक्यावर बोणालू वाहून यात्रेत सहभाग घेतला. संपूर्ण परिसर जयघोषाने आणि भक्तिरसाने दुमदुमून गेला होता.

या यात्रेत श्रमिकनगर, सावेडी परिसरातील पद्मशाली समाजाबरोबरच सर्व समाजातील नागरिकांनी सहभाग घेतला. महिला, पुरुष, युवक आणि ज्येष्ठ नागरिक उपस्थित राहिल्याने सामाजिक ऐक्याचे सुंदर दर्शन घडले.

बागुलू पंडुगू हा पद्मशाली समाजाचा पारंपरिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचा सण असून तो दरवर्षी आषाढ शुद्ध पौर्णिमेनंतर येणाऱ्या शुक्रवारी साजरा केला जातो. या दिवशी पोशम्मा तल्ली आणि लचमम्मा तल्ली देवीची विधिवत पूजा करून समाजातील सर्वांना उत्तम आरोग्य लाभावे, रोगराईपासून संरक्षण मिळावे, संतुलित पर्जन्यवृष्टी व्हावी, शेती समृद्ध राहावी तसेच समाजात सुख, शांती आणि समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना केली जाते. देवीला गोड पुरी, मेथीची भाजी, दही, हळद टाकलेला भात, नारळ, फुटाणे, लिंबाची पाने, ओवा आणि थंड पाणी असा पारंपरिक नैवेद्य अर्पण करण्याची परंपरा आजही श्रद्धेने जपली जात आहे. दिवसभर दोन्ही मंदिर परिसरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होती.

पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिला भगिनींनी भक्तिभावाने देवीची पूजा करून कुटुंबाच्या सुख–समृद्धीसाठी प्रार्थना केली. श्रद्धा, परंपरा, संस्कृती आणि सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडविणारा बागुलू पंडुगू उत्सव यंदाही श्रमिकनगर परिसरात उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

# सिस्पे घोटाळ्यातील प्रमुख संशयित आरोपीला फिजीहून आणले भारतात

**आर्थिक गुन्हे शाखेची कारवाई, इंटरपोलच्या रेड कॉर्नर नोटिसीनंतर यशस्वी प्रत्यर्पण**

नगर – जिल्ह्यातील हजारो गुंतवणूकदारांची कोट्यवधी रूपयांची फसवणूक झाल्याचा आरोप असलेल्या बहुचर्चित सिस्पे, इनफिनाईट बिकन व तत्सम कंपन्यांच्या आर्थिक घोटाळा प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले आहे. या प्रकरणातील संशयित आरोपी राहुल शामराव काळोखे याचे फिजी येथून भारतात यशस्वीरीत्या प्रत्यार्पण करण्यात आले असून, ३० जुलै रोजी त्याला भारतात आणण्यात आले. मुंबई विमानतळावर अहिल्यानगर आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले.

या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी श्रीगोंदा, सुपा आणि तोफखाना पोलीस ठाण्यांत सिस्पे, इनफिनाईट बिकन व तत्सम कंपन्यांविरोधात एकूण चार गुन्हे दाखल आहेत. या सर्व गुन्ह्यांचा तपास सध्या आर्थिक गुन्हे शाखेकडे असून, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक डॉ. शरद गोर्डे तपास करीत आहेत.

तपासादरम्यान संशयित आरोपींच्या आर्थिक व्यवहारांची सखोल पडताळणी करण्यात आली असून, विविध मालमत्तांचा तपशील संकलित करण्यात आला आहे.

त्यानुसार सुमारे ११४ कोटी ९३ लाख रूपयांच्या मालमत्तेच्या जप्तीच्या एमपीआयडी (महाराष्ट्र ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण अधिनियम) प्रस्तावाला राज्य शासनाने नुकतीच मंजुरी दिली आहे. याशिवाय आणखी मालमत्तांचा समावेश असलेला पुरवणी प्रस्ताव तयार करण्याचे कामही सुरू आहे. याचबरोबर फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांचे जबाब नोंदविण्याचे कामही युध्दपातळीवर सुरू आहे. शासनाकडून एमपीआयडी प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर आर्थिक गुन्हे शाखेत जबाब नोंदविण्यासाठी गुंतवणूकदारांची मोठी गर्दी होत आहे. या प्रकरणात यापूर्वी अनेक संचालक आणि एजंट यांना अटक करण्यात आली आहे.

मात्र, काही प्रमुख संशयित आरोपी देशाबाहेर पसार झाले होते. त्यांच्या विरोधात इंटरपोलमार्फत रेड कॉर्नर नोटीस जारी करण्यात आली असून, त्यांना भारतात परत आणण्यासाठी आर्थिक गुन्हे शाखेने सीबीआय, परराष्ट्र मंत्रालय, केंद्रीय गृह मंत्रालय आणि इंटरपोल यांच्या समन्वयातून विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. या प्रयत्नांना आता पहिले मोठे यश मिळाले असून, रेड कॉर्नर नोटीसवरील आरोपी राहुल काळोखे याला फिजीमध्ये शोधून तेथील स्थानिक अधिकार्यूंनी ताब्यात घेतले. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्याचे भारतात प्रत्यर्पण करण्यात आले. गुरूवारी त्याला भारतात आणण्यात आले असून, आर्थिक गुन्हे शाखेने मुंबई विमानतळावर त्याचा ताबा घेतला. दरम्यान, या प्रकरणातील संशयित आरोपींना भारतात आणण्यासाठी आणि गुंतवणूकदारांना न्याय मिळवून देण्यासाठी खासदार निलेश लंके यांनीही गेल्या अनेक महिन्यांपासून केंद्र व राज्यातील विविध तपास यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा केल्याचे सांगितले जात आहे.

# पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत सहभागी होण्याचे कृषी विभागाचे आवाहन

नगर – भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत अहिल्यानगर जिल्ह्यात पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना राबविण्यात येत असून मृग बहार सन २०२६ मधील अधिसूचित फळपिकांसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

या योजनेत संत्रा, मोसंबी, डाळिंब, चिकू, पेरू, लिंबू, सीताफळ, द्राक्ष तसेच नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या हळद व अंजीर या पिकांचा समावेश आहे. ही योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक असून योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांकडे ॲग्रीस्टॅक (Farmer ID) नोंदणी असणे तसेच डिजिटल पीक सर्वेक्षणांतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी प्रति शेतकरी किमान उत्पादनक्षम क्षेत्र वीस गुंठे असून सर्व फळपिके व दोन्ही हंगाम मिळून कमाल क्षेत्रमर्यादा चार हेक्टर राहील. केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच विमा संरक्षण लागू राहील.

मृग बहार सन २०२६ अंतर्गत संत्रा, मोसंबी, डाळिंब, चिकू, द्राक्ष, पेरू, लिंबू व हळद या पिकांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत १४ जुलै २०२६ असून सीताफळ व अंजीर या पिकांसाठी ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत आहे. अधिसूचित फळपिकांपैकी एका वर्षात एकाच क्षेत्रावर मृग अथवा आंबिया बहार यापैकी कोणत्याही एका हंगामासाठीच विमा संरक्षणाचा लाभ घेता येणार आहे. योजनेत सहभागी होण्याची इच्छा नसलेल्या कर्जदार शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीच्या सात दिवस अगोदर त्याबाबतचे घोषणापत्र संबंधित बँकेकडे सादर करणे आवश्यक आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### पालेभाज्या : पौष्टिकतेचा खजाना

पालेभाज्या या आपल्या जेवणातील साध्या पण शक्तिशाली घटक आहेत. प्राचीन काळापासून भारतीय आहारात यांना विशेष स्थान आहे आणि आता आधुनिक पोषणशास्त्रानेही यांना 'सुपरफूड'चा दर्जा दिला आहे. पालक, मेथी, अंबाडी, चाकवत, तांदुळजा अशा विविध पालेभाज्या लोह, कॅल्शियम, व्हिटॅमिन , व्हिटॅमिन उ, फोलेट आणि फायबरने समृद्ध असतात.यातील क्लोरोफिल आणि अँटिऑक्सिडंट्स शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास मदत करतात, तसेच रोगप्रतिकारशक्ती वाढवतात. पालेभाज्यांमधील लोह आणि फोलेटमुळे रक्ताची कमतरता दूर होते आणि थकवा कमी होतो. फायबरमुळे पचनक्रिया सुधारते, पोट साफ राहते आणि वजन नियंत्रणात मदत होते. कॅलरीज कमी पण पोषक घटक जास्त असल्याने मधुमेही आणि हृदयविकार असणाऱ्यांसाठीही या उत्तम आहेत.ल्यूटिन आणि झेक्सॅन्थिन सारखे घटक डोळ्यांच्या आरोग्यासाठी आणि त्वचा तजेलदार ठेवण्यासाठी उपयुक्त आहेत. कॅल्शियम आणि व्हिटॅमिन घ मुळे हाडे मजबूत होतात. आयुर्वेदात पालेभाज्यांना पित्तशामक आणि रक्तशुद्ध करणारे मानले आहे.

## पाककला

### बासुंदी ब्राउनी

**साहित्य :** मैदा १ कप, कोको पावडर १/२ कप, पिठी साखर ३/४ कप, वितळवले बटर १/२ कप, अंडी २, व्हॅनिला इसेन्स १ चमचा, बेकिंग पावडर १/२ चमचा, चिमूटभर मीठ, डार्क चॉकलेट चंक्स १/४ कप

**बासुंदी साठी :** फुल क्रीम दूध २ कप, साखर ३ चमचे, खवा २ चमचे किसलेला, केशर ५-६ काड्या, वेलची पावडर १/४ चमचा, बारीक चिरले पिस्ता-बदाम १ चमचा

**कृती :** एका भांड्यात वितळवलेले बटर आणि पिठी साखर एकत्र फेटून घ्या. त्यात अंडी आणि व्हॅनिला इसेन्स घालून पुन्हा छान मिक्स करा. दुसऱ्या भांड्यात मैदा, कोको पावडर, बेकिंग पावडर आणि मीठ चाळून घ्या. हे कोरडे मिश्रण ओल्या मिश्रणात घाला. शेवटी चॉकलेट चंक्स मिसळा. बेकिंग ट्रेला बटर लावून बटर पेपर लावा. मिश्रण ट्रेमध्ये ओता. प्रीहीट केलेल्या ओव्हनमध्ये २५-३० मिनिटे बेक करा. ब्राउनी मध्यातून थोडी फजि राहिली पाहिजे. गार झाल्यावर चौकोनी तुकडे करा.बासुंदी साठी जाड बुडाच्या पातेल्यात दूध आटवत ठेवा. त्यात साखर आणि किसलेला खवा घालून घट्ट होईपर्यंत ढवळा. शेवटी केशर आणि वेलची पावडर घाला. थंड करून त्यात पिस्ता-बदाम घाला. सर्व्ह करताना गरम ब्राउनीच्या तुकड्यावर थंड बासुंदी ओता. वरून केशर आणि ड्रायफ्रूट्सने सजवा.

## वास्तू

### खडे मिठाने पुसा घर

घर मिठाच्या पाण्याने पुसणे ही एक जुनी आणि प्रभावी पद्धत आहे. एका बादली पाण्यात २ चमचे खडे मीठ किंवा साधे मीठ टाकून ते पूर्ण विरघळवून घ्या. आठवड्यातून एकदा विशेषतः गुरुवारी किंवा शनिवारी सकाळी या पाण्याने घर पुसल्याने घरातील नकारात्मक ऊर्जा कमी होते.

## सौंदर्य

रात्री झोपण्यापूर्वी ताजे एलोवेरा जेल पायांना लावा आणि मोजे घाला. सकाळी धुवा. याने पायावरील काळे डाग हलके होतात.

## सल्ला

दही लावल्यावर त्यात चिमूटभर मीठ घाला. २ दिवस जास्त टिकते आणि आंबट होत नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

**शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६**

**लो. टिळक पुण्यतिथी, शाहिर अण्णाभाऊ साठे जयंती, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, शततारा २०।४६, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०७ वा. ११ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज तुम्हाला थकवा जाणवेल. कुटुंबासोबत चांगला वेळ जाईल.

**वृषभ :** तुमची आर्थिक स्थिती स्थिर राहील. कामाच्या ठिकाणी नवीन जबाबदारी मिळेल.

**मिथुन :** तुमच्या मनात नवीन विचार येतील. अभ्यास आणि लेखनात प्रगती होईल तसेच मित्रांची भेट होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** आजचा दिवस भावनिक असेल. घरात लहान आनंदाचे प्रसंग घडतील आणि कुटुंबाचे लक्ष आरोग्याकडे जाईल.

**सिंह :** करिअरमध्ये तुम्हाला नवीन संधी मिळतील. तुमचा आत्मविश्वास वाढेल पण खर्च थोडा जास्त होईल.

**कन्या :** दिवस नियोजनबद्ध पद्धतीने जाईल. आरोग्य मध्यम राहील आणि लहान प्रवास होण्याची शक्यता आहे.

**तूळ :** नातेसंबंधात जवळीक वाढेल. जोडीदाराचा सहवास लाभेल.

**वृश्चिक :** काही लपलेल्या गोष्टी समोर येतील. आर्थिक व्यवहारात चढ-उतार राहतील आणि मनात थोडा गोंधळ असेल.

**धनु :** शिक्षण आणि प्रवासाचे योग आहेत. नवीन लोकांशी ओळख होईल आणि दिवस आशादायक राहील.

**मकर :** कामाचा ताण वाढेल. वरिष्ठांकडून तुमचे कौतुक होईल आणि कुटुंबाकडून अपेक्षा वाढतील.

**कुंभ :** मित्र आणि सहकाऱ्यांकडून सहकार्य मिळेल. तंत्रज्ञानाशी संबंधित कामात तुम्हाला यश मिळेल.

**मीन :** सर्जनशील कामात तुमचा रस वाढेल. मनात शांतता राहील आणि तुम्ही आध्यात्मिक गोष्टींकडे आकर्षित व्हाल.

## शब्दगंध क्र. ७४८५ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ■ | २ | ३ | ४ | ■ | ५ | |
| ६ | ७ | | | | | | ■ |
| ८ | | | ■ | | ■ | ९ | |
| ■ | | ■ | १० | ■ | ११ | | ■ |
| १२ | | | ■ | १३ | | | १४ |
| १५ | | ■ | १६ | | ■ | १७ | |
| | ■ | १८ | | | | ■ | |
| १९ | | | ■ | | ■ | २० | |

**आडवे शब्द :-** २) कोणत्याही वस्तू किंवा पदार्थ ५) शेवट; अंत; अखेर ६) संत एकनाथांनी लिहिलेली रामकथा ८) तीव्र उठणारी वेदना; कळ; तिडीक ९) देह; शरीर; काया १०) आण्याचा बारावा अंश; एक मराठी आडनाव ११) पूर्व दिशा १२) आकाशातून जाणारे एक वाहन १३) लोकसभा किंवा राज्यसभेचा सभासद १५) एखाद्या संख्येच्या वर्गाला त्याच संख्येने गुणून येणारी संख्या १६) शेत; वन; अरण्य; वावर १७) वसुंधरा; पृथ्वी; धरती १८) विधानसभा किंवा विधान परिषदेचा सभासद १९) दैव; प्राक्तन; प्रारब्ध २०) खोगीर; पलाण (घोड्याचे)

**उभे शब्द :-** १) आहे असे वाटणे पण प्रत्यक्षात नसणे अशी स्थिती; भ्रम; भ्रांती २) साफल्य; काही केल्याचे समाधान ३) वृष्टी; वर्षाव ४) मुस्लिमांची प्रार्थना ५) टोकदार; नोकदार ७) किराणा दुकानातून आणलेले सामान ११) एक शब्दालंकार १२) घटक वेगळे होण्याची क्रिया १३) उच्च कूळ; उच्च घराणे १४) एक शास्त्र; केमिस्ट्री १६) अयोध्येचा राजा; सीतापती १८) प्रतिष्ठा; पत; अब्रू; योग्य डौल; पाणी

**शब्दगंध क्र. ७४८४ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नृ | ■ | पा | व | न | ■ | मा | य |
| सिं | धु | दु | र्ग | ■ | क | सा | रा |
| ह | य | का | ■ | मो | र | ■ | ज |
| ■ | वि | ■ | घा | ■ | वि | ज | य |
| रा | णे | ■ | व | नि | ता | ■ | ■ |
| जा | ■ | पा | ■ | रं | ■ | का | क |
| रा | म | च | रि | त | मा | न | स |
| म | ■ | क | ता | र | ■ | स | स |

**फिल्मीचक्कर क्र. १२४७ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| का | जो | ल | ■ | गो | विं | दा | ■ |
| ■ | ह | ■ | रा | म | ■ | मि | ■ |
| च | र | स | ■ | ती | ■ | नी | ल |
| ल | ■ | ■ | मु | के | श | ■ | लि |
| उ | ■ | मैं | ■ | कि | ■ | पि | ता |
| ड | र | ■ | ■ | ना | ना | ■ | प |
| जा | ■ | बा | व | रे | ■ | ■ | वा |
| रे | खा | ■ | र्मा | ■ | दी | वा | र |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** कष्टाशिवाय फळ नाही आणि प्रयत्नाशिवाय यश नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### फिंगरप्रिंट्स सगळ्यांचे वेगळे का असतात?

आपल्या हाताच्या पाची बोटांच्या टोकांवर आणि तळहातावर बारीक बारीक रेषा, वळणे आणि गोलाकार नक्षी असते. यालाच आपण 'फिंगरप्रिंट' किंवा 'बोटांचे ठसे' म्हणतो. कधी कधी शाई लावून कागदावर बोटाचा ठसा उमटवला जातो, तर कधी मोबाईलच्या स्क्रीनवर बोट लावले की तो उघडतो. पण तुम्हाला माहिती आहे का की जगात कोणत्याही दोन माणसांचे फिंगरप्रिंट्स एकसारखे नसतात?

बाळ आईच्या पोटात असतानाच म्हणजे सुमारे १० ते १६ व्या आठवड्यात त्याच्या बोटांवर या रेषा तयार व्हायला सुरुवात होते. या रेषा कशा असतील हे ठरवण्याचे काम आपले जीन्स करतात. जीन्स म्हणजे आपल्याला आई-वडिलांकडून मिळालेले गुणधर्म. पण फक्त जीन्सच नाहीत, तर आईच्या पोटातील पाण्याचा दाब, तापमान आणि बाळ बोटे कशी हलवते यावरही या नक्षीचा आकार अवलंबून असतो. म्हणूनच जरी दोन मुले जुळे असली आणि त्यांचे डीएनए एकसारखे असले तरीही त्यांचे फिंगरप्रिंट्स मात्र वेगवेगळे असतात. निसर्गाने प्रत्येकाला वेगळे बनवण्यासाठी ही खास युक्ती केली आहे.

जगात आज ८०० कोटींपेक्षा जास्त लोक आहेत. तरीही शास्त्रज्ञांनी आजपर्यंत दोन सारखे फिंगरप्रिंट्स शोधून काढलेले नाहीत. तुमचे फिंगरप्रिंट्स, तुमच्या भावाचे, बहिणीचे, मित्राचे आणि शिक्षकांचे सगळेच वेगळे आहेत. एकदा हे ठसे तयार झाले की ते आयुष्यभर बदलत नाहीत. लहानपणी बोट छोटे असते आणि मोठे झाल्यावर मोठे होते, पण त्यावरील रेषांची नक्षी तशीच राहते. जरी बोटाला काप लागले तरी नवीन त्वचा आल्यावर त्याच जुन्या नक्षीच्या रेषा पुन्हा तयार होतात. फिंगरप्रिंट्सचे उपयोग खूप आहेत. सर्वात आधी पोलीस गुन्हेगाराला पकडण्यासाठी याचा वापर करतात. गुन्ह्याच्या ठिकाणी बोटाचा ठसा सापडला की तो कोणाचा आहे हे सहज कळते. त्याचबरोबर आजच्या आधुनिक जगात आपली ओळख पटवण्यासाठी फिंगरप्रिंट्स खूप महत्वाचे आहेत. मोबाईल लॉक उघडणे, बँकेतून पैसे काढणे, शाळेत हजेरी लावणे, आधार कार्ड आणि पासपोर्ट बनवणे अशा अनेक ठिकाणी आपले फिंगरप्रिंट्स कामाला येतात.

कारण ते चोरी होऊ शकत नाहीत आणि कुणालाही नक्कल करता येत नाहीत.वैज्ञानिकांच्या मते, एका बोटावर १५० हून अधिक खास बिंदू असतात. या बिंदूंची जागा, रेषांचे वळण आणि त्यांची जाडी हे सगळे मिळून एक अनोखी नक्षी तयार होते. म्हणूनच फिंगरप्रिंट्सला आपले 'नैसर्गिक ओळखपत्र' म्हटले जाते.थोडक्यात, निसर्गाने आपल्या बोटांवर कोरलेल्या या छोट्या रेषांमुळे आपण प्रत्येकजण वेगळे आहोत. आपला प्रत्येक अंगठा आणि बोट हे आपली खास ओळख आहे, जी आपल्याला इतरांपेक्षा वेगळे करते.

### कामाचे महत्व

एका गावात रामू नावाचा एक तरुण शेतकरी राहत होता. तो खूप मेहनती होता, पण एक सवय त्याला होती - नंतर करू, उद्या करू. एकदा गावात खूप पाऊस पडणार असल्याची बातमी आली. गावातील म्हातारे म्हणाले, रामू, शेतातील धान्य लवकर कापून घरात भरून ठेव. नाहीतर सगळे पावसात भिजून जाईल. रामू म्हणाला, आता उन्ह आहे, २ दिवसांनी करतो.

दोन दिवस गेले, पण रामूने काम केले नाही. तिसऱ्या दिवशी अचानक काळे ढग आले आणि मुसळधार पाऊस सुरू झाला. रामू धावत शेतात गेला, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. त्याचे पूर्ण पिक पावसात भिजून नासले.

रामू खूप दुःखी झाला. तेव्हा गावातील आजोबा त्याच्याजवळ आले आणि म्हणाले, बाळा, वेळ कधीच कोणाची वाट बघत नाही. जो माणूस वेळेची किंमत करतो, वेळही त्याची किंमत करते. माणूस जर आळशी झाला तर त्याच्याजवळ कितीही शक्ती असली तरी उपयोग नाही. आणि काम हे वेळेवरच केले पाहिजे. उद्यावर ढकललेले काम हे कधीच पूर्ण होत नाही. त्या दिवशी रामूला समजले.

दुसऱ्या वर्षी त्याने वेळेच्या आधीच सगळी कामे केली. त्याचे पीक चांगले आले आणि तो गावातील सर्वात सुखी शेतकरी बनला.

तात्पर्य : वेळ सोन्यापेक्षा महाग आहे. वेळ गेली की परत येत नाही. म्हणून प्रत्येक माणसाने आपले काम वेळेवर आणि मेहनतीने केले पाहिजे. आळस करशील तर पश्चाताप होईल, वेळेची किंमत केलीस तर यश नक्की मिळेल.

## आत्मशक्ति



संत सांगतात की, जे मरते ते पंचमहाभूतांनी बनविलेले शरीर! त्याचा शेवट होतो. ते सडते व नाश पावते. पण आमचे खरे रुप तर आत्मा आहे. तो तर अमर आहे. तो नेहमीच जीवंत असतो, मरण पावते ते भौतिक शरीर! शरीर हे आत्म्याचे आवरण, तेव्हा लक्षात घ्यावे की आम्हाला मृत्यु नाही. आत्मा पूर्वी होता, आता आहे व भविष्यातही तो राहणार आहे. जर ही जाणीव मनांत पूर्णपणे बिंबवली तर आम्हाला वाटणारी मृत्यूची भीति शिल्लक राहणारच नाही!

सत्य कोणालाही घाबरत नाही !

आत्मा सत्य आहे. कधी ना कधी, आपण उघडे पडलो जाऊ अशी खोट्याला भीति असते.

### कर्मविधाने

महात्मा गांधी नेहमीच म्हणायचे की, 'सत्याचा नेहमीच विजय होतो, सत्य सर्वांना जिंकते. आम्ही जर सत्याने वागलो तर कोणालाही घाबरण्याचे कारण नाही.

तुम्ही माना अथवा मानू नका पण निसर्गाचे नियम हे सारे ब्रह्मांड चालविते. आम्हाला हे नियम माहित नाहीत असे म्हणणे म्हणजे बहाणे शोधणे होय. आम्हाला माहित असते की आम्ही इतरांना धोके देऊ शकतो, स्वतःलाही धोके देऊ शकतो, परमेश्वराला धोके देऊ पहातो, म्हणून आम्ही कर्मविधाने टाळू शकत नाही. खरी गोष्ट केव्हा ना केव्हा उघड होते व कर्माचे फळ भोगावे लागतेच!

वर्तमानपत्रांत आपण वाचतो की चोर बँक लुटून पसार झाले. आईबाप मुलांशी खोटे बोलतात त्याप्रमाणे मुलेही आईबापांशी खोटे बोलतात. आम्ही आमच्या कार्यालयांतून पैसे चोरू शकतो. आम्ही जवळच्या लोकांना धोके देऊ शकतो, आपले काम करून घेण्यासाठी आम्ही लोकांना आमच्याबद्दल वाढवून फुगवून (खोटे) सांगत असतो, आपले काम व्हावे म्हणून दुसऱ्यांशी लबाडीने वागतो आणि आम्ही अशी आश्वासने देतो की ती केव्हाच पूर्ण करता येत नाहीत. असे खोट्यांचे अनेक प्रकार असतात; परंतु सत्य नेहमीच उघडकीला येते. येथे जरी नाही तरी यमाचे दारी स्पष्ट होतेच. जरी आम्ही कोणताही धर्म पाळीत असू तर आम्ही लक्षात घ्यावे की प्रत्येक धर्मात सांगितले आहे की केलेल्या कृत्यांचा हिशोब ठेवला जातो. त्याबाबतचे वेगवेगळे तपशील सांगण्यात आले आहेत. पण हिशोब मात्र नक्कीच ठेवले जातात.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय :

पण मी ह्यावरून विचार केला. एक लहान मूल ज्याचा मेंदू अजून पूर्णतः विकसित नाहीये, त्याला ह्या गोष्टी समजतात ?

शिवानीदीदी : त्याला गोष्टी समजत नसल्या तरीही त्याला सगळ्या भावना कळतात. जेव्हा आपण ध्यान आणि अनासक्ती व आत्म्याची चेतना यासंबंधी शिकतो तेव्हा आपण भौतिक गोष्टींत न अडकण्याचा प्रयत्न करतो, त्यामुळे आपल्या मनातला गोंधळ हळूहळू कमी होऊ लागतो. मन शांत होतं आणि इतरांची स्पंदनं ग्रहण करू शकतं. अगदी संतांप्रमाणेच. जेव्हा आपण आपल्या मनातलं काही विचारायला संतांकडे जातो तेव्हा आपण काही बोलायच्या आधीच ते आपल्याला उत्तर देतात.

सुरेश ओबेरॉय : बरोबर.

शिवानीदीदी त्यांना हे जमतं कारण अनेक वर्ष ध्यान केल्याने त्यांचं मन शांत असतं. आपल्याला

### निरागसता

ही जादू वाटते पण हे कोणीही करू शकतं. आपलं मन शांत असताना आपण दुसऱ्या आत्म्याला भेटलो तर त्याचे तरंग आपण सहजतेने ग्रहण करू शकू. आपल्यापैकी काहींना हे तरंग जाणवतात. ज्यांनी अनेक वर्ष ध्यान केलं आहे त्यांना विशिष्ट तरंग जाणवतात आणि त्याप्रमाणे ते प्रतिसादही देतात. लहान मुलांमध्येही तीच शुद्धता, निरागसता आणि आत्म्याची जाणीव असते. लहान मुलांमध्ये विचारांचा पसारा नसतो. त्याला अहंकार नसतो किंवा खूप साऱ्या भावनाही नसतात. त्यामुळे त्याच्याकडे तरंग समजून घ्यायची प्रचंड शक्ती असते. जेव्हा एक आत्मा आईच्या उदरात असतो तेव्हा त्याची ग्रहणक्षमता सर्वाधिक असते.

सुरेश ओबेरॉय : खरंच ?

शिवानीदीदी आईच्या उदरात आत्मा संपूर्णपणे अनासक्त असतो आणि त्यामुळे तो सगळं काही ग्रहण करतो. म्हणूनच आत्म्याचा उदरात प्रवेश झाल्यापासून, अगदी सुरुवातीपासूनच पालकांनी काळजी घ्यायला हवी. जेव्हा आपल्या घरात एखादं मूल जन्माला येणार असतं तेव्हा आपण त्या आत्म्याचं स्वागत शुद्ध स्पंदनांनी करायला हवं. आध्यात्मिक स्तरावर आपल्याला समजतं की त्या आत्म्याबरोबर आपलं कार्मिक खातं (अकाउंट) आहे. आपण त्या आत्म्याला मागील जन्मांत कधीतरी भेटलेलो आहोत. त्यामुळे आपण त्याला अभिनंदनाची ऊर्जा पाठवू शकतो. आजकाल पालक काळजीत आणि तणावाखाली असतात. आपण येणाऱ्या बाळाला चांगलं आयुष्य देऊ शकतो का? त्याला वाढवण्यासाठी आपल्याकडे सगळं आहे ना? असा विचार ते करतात.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

चिंटू : पेपरमधले सर्व प्रश्न मला येत होते

पिंटू : मग पास झालास का?

चिंटू : नाही रे, प्रश्नपत्रिकाच दुसऱ्याची होती

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* मानवाच्या शरीरातील सर्वात मोठा अवयव कोणता?

– त्वचा

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

रोज केल्यास त्यांची वाढ निरोगी होईल. तसेच स्नायू, हाडे बळकट होऊन रोगप्रतिकारक शक्ती वाढेल व कुपोषणाला आळा बसेल.

दमा, सर्दी, खोकला, क्षयरोग या विकारांवर शेवग्याच्या पानांचे सूप फार उपयुक्त ठरते. दीड ग्लास पाण्यात मूठभर शेवग्याची पाने घालून ते पाणी उकळावे. त्यानंतर ते गाळून जिरेपूड, सैंधव, काळी मिरीपूड यांची गायीच्या तुपात फोडणी द्यावी व गरम गरम सूप थोडे लिंबू पिळून लगेचच प्यावे. यामुळे छातीतील कफ कमी होतो. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढून वरील विकार दूर होतात. शरीरात रक्त कमी असणे, कॅल्शिअम, जीवनसत्त्वांची कमतरता असणे, कुपोषण, अशक्तपणा, तसेच त्वचाविकार, इतर संसर्गजन्य विकारांवर शेवग्याची फुले, पाने, शेंगा यांचे सूप करून प्यावे. यामध्ये जंतुनाशक गुणधर्म असल्यामुळे, तसेच सर्वच जीवनसत्त्वे असल्यामुळे

### शेवगा

अशक्तपणा कमी होऊन कुपोषण थांबते.

शेवग्याची पाने, फुले व साल यामध्ये काम तेजक गुणधर्म असल्यामुळे वंध्यत्व असणाऱ्या दाम्पत्यांनी, तसेच शुक्रजंतू कमी असणाऱ्या पुरुषांनी शेवग्याचा आहारात वापर करावा. एक लिटर पाण्यात ध्ये बारा चमचे शेवग्याच्या सालीचे चूर्ण उकळून ते अर्धा लिटर करावे. नंतर हे पाणी दिवसभरात तीन ते चार वेळा प्यावे. हा प्रयोग सलग दोन-तीन महिने केल्यास शुक्रजंतूंची वाढ झालेली दिसून येते.

जुलाब होत असतील, तर शेवग्याच्या ताज्या पानांचा रस दोन चमचे, शहाळ्याचे पाणी अर्धा ग्लास व अर्धा चमचा मध हे मिश्रण दिवसातून दोन वेळा घ्यावे. याने जुलाब आटोक्यात येऊन थकवा नाहीसा होतो.

लघवीला जळजळ होऊन जननेंद्रियांची आग होत असेल व त्यामुळे थेंब थेंब लघवी होत असेल त एक कप शेवग्याच्या पानांचा रस, एक कप काकडीरस व एक कप गाजररस हे सर्व रस एकत्र करून ते दिवसातून तीन वेळा प्यायल्यास शरीराची उष्णता कमी होऊन लघवी साफ होते.

मुरुमे, पुटकुळ्या, तेजहीन रूक्ष त्वचा इत्यादी विकारांवर शेवग्याच्या ताज्या पानांचा कल्क चेहऱ्यावर हलक्या हाताने चोळून लावावा. याने चेहरा स्वच्छ व कांतियुक्त होऊन काळे डाग कमी होतात.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००



कै. ग. रा. तथा रावसाहेब म्हस्के यांच्या पुण्यतिथीनिमित्त गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करताना मान्यवर.

# रावसाहेब म्हस्के यांचे चरित्र आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी

## प्रा. टी. एन. दहातोंडे यांचे प्रतिपादन; कै.म्हस्के यांच्या पुण्यतिथीनिमित्त गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे माजी सचिव, शिक्षण, सहकार व सामाजिक क्षेत्रातील दूरदृष्टीचे नेतृत्व लाभलेले कै. ग. रा. तथा रावसाहेब म्हस्के यांच्या पुण्यतिथीनिमित्त रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये भावपूर्ण वातावरणात अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी रावसाहेबांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच विद्यार्थी–सेवक कल्याण संस्थेच्या वतीने होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना गणवेशांचे वितरण करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सहसेक्रेटरी मुकेश मुळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून रेसिडेन्शिअल हायस्कूलचे माजी प्राचार्य प्रा. टी. एन. दहातोंडे उपस्थित होते. तसेच संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे, संस्थेच्या खजिनदार श्रीमती दीपलक्ष्मी म्हसे, ज्येष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी व जयंत वाघ यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात कै. रावसाहेब म्हस्के यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. विद्यालयाचे प्राचार्य श्री व्ही. व्ही. जाधव यांनी प्रास्ताविकातून रावसाहेबांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संस्थात्मक कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

यानंतर विद्यार्थी –सेवक कल्याण संस्थेमार्फत दोनशे पेक्षा होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना गणवेशांचे वितरण करण्यात आले. रावसाहेबांच्या पुण्यस्मरणानिमित्त हस्ताक्षर, निबंध, चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगत व भाषणातून रावसाहेबांच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या समाजाभिमुख विचारांचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रमुख पाहुणे प्रा. टी. एन. दहातोंडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले, रावसाहेब म्हस्के यांचे चरित्र आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. शिक्षण, सहकार आणि समाजकारण या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श प्रत्येक विद्यार्थ्याने व युवकाने डोळ्यांसमोर ठेवावा.असे सांगत त्यांनी रावसाहेबांच्या अनेक आठवणींना उजाळा दिला.

संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, रावसाहेबांनी शिक्षण, सहकार आणि राजकीय क्षेत्रात केलेले कार्य आजही समाजाला नवी ऊर्जा देणारे आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जतन करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. अध्यक्षीय समारोपात मुकेश मुळे यांनी रावसाहेबांचे कार्य समाजाभिमुख, दूरदर्शी व सर्वसामान्यांच्या विकासासाठी समर्पित असल्याचे सांगितले. समाजहितासाठी त्यांनी केलेल्या कार्याची प्रेरणा प्रत्येकाने घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र देवढे यांनी केले, तर सौ. वैशाली दारकुंडे यांनी आभार मानले.

यावेळी उपप्राचार्य दादासाहेब वांढेकर, उपमुख्याध्यापक पवार बी. एम., पर्यवेक्षक म्हस्के डी. सी., सोनवणे एस. जी., सौ. मरकड व्ही. के., शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. रावसाहेबांच्या कार्याचा गौरव करणारा हा प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

# प्रेरणादायी अक्षरधन

## वृथा अभिमान...

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स




महाभारतात विदुरानं म्हटलंय, जरा रुपं हरति हि धैर्यमाशा मृत्युः प्राणानं धर्मचर्यामसूया । क्रोधः श्रियं शीळमनार्यसेवा ह्रियं कामः सर्व सेवाभिमान ।। म्हातारण आलं की लावण्य गेलं, आशेनं मनात मूळ धरलं की अधीरपण आलं? मरण ओढवलं, की प्राणाचं अस्तित्व संपलं. मनात मत्सर भरला की, सत्प्रवृत्तींना फाटा मिळाला. उठता बसता रागावणं, म्हणजे भाग्याचे मार्ग स्वतःच रोखणं? वाईटाच्या संगतीत राहावं, तर चारित्र्य गमावून बसावं. पण या सगळ्यावर मात करता अभिमान । गर्व नष्ट करतो हे सर्व. गर्वापायी सौंदर्य जातं वाया, धैर्याचा नष्ट होतो पाया, प्राणांवर ओढवते आपत्ती, संपते सत्प्रवृत्ती। भागनय लयाला जाते. चारित्र्य डागाळते. माणसा । म्हणून अभिमानाचा वारा लागू देउ नको. अभिमानापायी अपमानाच्या यातना सोसू नको.

रामेश्वर भट्टांचा हा अभंग पाहा. स्वतः च्या पांडित्याचा त्यांना भयंकर गर्व. त्यापायी तुकाराम महाराजांना त्यांनी खूप त्रास दिला. पण नियतीजवळ न्याय आहे. त्या रामेश्वराला रोग जडला. तो आळंदीला ज्ञानेश्वरांच्या समाधीजवळ स्वास्थ्य मागू लागला, तेव्हा त्याला दृष्टान्त झाला, की हे सगळे दुःख तुला झाले याचे मुळ आहे तुझ्या अभिमानात. माझी मज झाली रोकड प्रचीत होउनी फजित दुःख पावे।

काही द्वेष त्याचा करिता अभिमाने व्यथा या शरीरी बहुत झाली. अभिमानाने फुगली. शरीरस्वास्थाला मुकलो. आली लगेच अनुभूती. गमावली सगळ्यांची सहानुभूती. झाली केवळ फजिती. दुःखाला तर नाही गणती. केवळ गर्वापायी मी हुउन्मत झालो. तुकारामबुवांचा छळ करुन बसलो. त्या वृथा अभिमानाचे दुष्परिणाम भोगू लागलो. अनेक रोगांचे माहेरघर बनलो ।

हे सगळे तुकोबांनी ऐकले. तुकोबा हेलावले. तुकोबांच्या संत सामर्थ्याने दुरभिमानी रामेश्वराचे दुखणे नाहीसे झाले. भक्तिविजयात संत महिपती म्हणतात, की देही जडली अभिमानममता काय क्रोध चित्ता गांजिले ।।

एकदा अभिमानाला उराशी कवटाळले, की राग आणि वासना यांनी चित्त व्यथित झाले। अभिमान गमवतो भान, मग सर्वस्वाचा नाश क्रमप्राप्तच। कारण अभिमानाने जागते दुर्बुद्धी?

एका मोठ्या हॉटेलात एक धनिक नेहमी थांबायचा. तिथे चोरांचा फार उपद्रव. पण या धनिकाला स्वतःच्या चातुर्याचा अभिमान. चोरांना फसविण्यासाठी करायचा तो युक्त्या वेगवेगळ्या. एकदा एक हिऱ्यांची अंगठी त्याने अगदी वरच ठेवली. सोबत चिठ्ठी ठेवली ही नकली अंगठी आहे. खरी अंगठी सुरक्षित ठिकाणी दडवली आहे. आणि तो बाहेर गेला.

दोन दिवस ती अंगठी तशीच राहिली. आता तर त्याचा अभिमान आणखी वाढला. कसे बनवले चोराला । पण तिसरे दिवशी तो परतला तेव्हा अंगठी तिथे नव्हती दुसरी एक चिठ्ठी मात्र लिहिलेली होती.

मी चोर नकली, म्हणून मला हवी होती अंगठीही नकलीच. मी घेतली. तुम्हाला लखलाभ होवो तुमची दडवलेली अंगठी। धनिकाने छाती बडवली. अभिमानापायी अंगठी गमावली।

**– किशोर गांधी**

# आर्किटेक्चरच्या (वास्तुकला) २०२६ प्रवेशासाठी 'नाटा' परीक्षा देण्यासाठी विद्यार्थ्यांना शेवटची संधी

नगर – देशभरातील वास्तुकला महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेली नॅशनल ॲप्टिट्यूड टेस्ट इन आर्किटेक्चर ('नाटा') २०२६ परीक्षेची प्रक्रिया सुरु झाली आहे . कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर न्यू दिल्ली द्वारे आयोजित केली जाणारी ही परीक्षा बी.आर्च या पाच वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमासाठी अनिवार्य आहे.

नाटा २०२६ ची नोंदणी प्रक्रिया एप्रिल मधेच सुरू झाली असून याची नोंदणी नाटा २०२६ वेबसाईट वर विद्यार्थ्यांनी करावी. नाटा परीक्षेची पहिली फेज पूर्ण झाली असून, नाटा परीक्षेची दुसरी फेज ७ व ८ ऑगस्ट २०२६ रोजी असून जे विद्यार्थी पहिल्या फेजला बसू शकले नाही त्यांनाच हि परीक्षा एकवेळेसच देता येऊ शकणार आहे. परंतु या विद्यार्थाना ॲडमिशन प्रक्रिया पूर्ण झाल्यावर रिक्त असलेल्या जागांसाठीच प्रवेश घेता येऊ शकेल. तरी विद्यार्थांनी नाटा २०२६ परीक्षेसाठी नोंदणी ४ ऑगस्ट पर्यंत करून घ्यावी. नाटा परीक्षेच्या अधिक माहितीसाठी https://www.nata.in या वेबसाईटला भेट द्या.

वास्तुकला क्षेत्रातील करिअरसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी वाळूंज येथील 'रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्चर' हे नामांकित आणि प्रतिष्ठित महाविद्यालय आहे. नाटा प्रवेश परीक्षेच्या अधिक माहितीसाठी आणि मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या ॲडमिशन सेलशी ९८६०४९५४९४ / ८६०५०५३०२५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त सी. ए. रमेश फिरोदिया, संस्थेचे सल्लागार विश्वस्त डॉ. शरद कोलते आणि प्राचार्य आर्की. सुहास चौधरी यांनी केले आहे.

# गुरुपौर्णिमेनिमित्त सनबीम्स प्री-प्रायमरीची रंगली संस्कारमय बालदिंडी

नगर – कर्नल परब संचलित सनबीम्स प्री–प्रायमरी शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि गुरुजनांविषयी आदरभाव रुजविण्याच्या उद्देशाने गुरुपौर्णिमानिमित्त संस्कारमय बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. दिंडीच्या माध्यमातून चिमुकल्या विद्यार्थ्यांनी गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांचा उत्साह, टाळ–मृदंगाचा निनाद आणि विठ्ठल... विठ्ठल...च्या अखंड नामघोषाने परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला.



शिलाविहार रोड येथील सनबीम्स प्री–प्रायमरी शाळेत बालदिंडी काढण्यात आली.

भारतीय संस्कृतीमध्ये गुरुला सर्वोच्च स्थान असून, विद्यार्थ्यांच्या मनात गुरुंचे महत्त्व लहानपणापासूनच रुजावे तसेच गुरुजनांविषयी आदर, कृतज्ञता आणि संस्कारांची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हस्ते कर्नल परब स्कूलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ), गीता दिलीप परब, यांचे विधिवत गुरुपूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी गुरुंच्या चरणी नतमस्तक होत त्यांच्याप्रती आदर व्यक्त केला.

शिलाविहार रोड येथील सनबीम्स प्री–प्रायमरी शाळेपासून बालदिंडीला उत्साहात प्रारंभ झाला. दिंडीने परिसरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करून विठ्ठल–रुक्मिणी मंदिरापर्यंत प्रस्थान केले. दिंडीत सहभागी झालेल्या चिमुकल्यांनी वारकरी परंपरेचे दर्शन घडविणारी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. हातात टाळ, मृदंग आणि भगवे पताके घेऊन ज्ञानोबा–तुकाराम, विठ्ठल... विठ्ठल...अशा नामघोषात विद्यार्थ्यांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात रंगविला. दिंडीचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांनीही रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती.

या दिंडीत विद्यार्थ्यांसोबत शिक्षक, पालक आणि परिसरातील नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. चिमुकल्यांचा निरागस उत्साह आणि शिस्तबद्ध सहभाग पाहून उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले. दिंडीमुळे विद्यार्थ्यांना वारकरी परंपरा, भक्ती, गुरु–शिष्य नाते आणि भारतीय संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला.

# आयसीएसई राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत कर्नल परब्स् स्कूलचे यश

## ८ सुवर्ण, १ रौप्य व २ कांस्यपदकांची कमाई; ९ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय आयसीएसई बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

नगर – पुण्यातील द बिशॉप्स स्कूल, कल्याणी नगर, पुणे येथे २८ व २९ जुलै रोजी पार पडलेल्या आयसीएसई झोनल आणि स्टेट बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत कर्नल परब्स् स्कूल, अहिल्यानगरच्या विद्यार्थ्यांनी आपल्या दमदार खेळाच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन करत ८ सुवर्णपदके, १ रौप्यपदक आणि २ कांस्यपदके पटकावली. राज्यभरातील बलाढ्य स्पर्धकांमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विद्यार्थ्यांनी शाळेचा तसेच अहिल्यानगरचा नावलौकिक उंचावला.



आयसीएसई झोनल आणि स्टेट बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत यश मिळविलेले कर्नल परब्स् स्कूलचे खेळाडू व मार्गदर्शक शिक्षक.

स्पर्धेत श्रीराज सुरवसे, वेदांत बडे, सिया आडसुरे, आराध्या खंडेलवाल, अनय परदेशी, प्रद्युमन शेळके, ईश्वरी जाधव आणि काव्या खिळे यांनी सुवर्णपदकांवर आपले नाव कोरले. शेख अल हमजा याने रौप्यपदकाची कमाई केली, तर वरद गावडे, अलिना पठाण यांनी कांस्यपदक पटकावत शाळेच्या यशात मोलाची भर घातली.

या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे सर्व सुवर्णपदक विजेते विद्यार्थी तसेच अर्णव निकरड यांची आगामी राष्ट्रीय आयसीएसई बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. राष्ट्रीय स्तरावर शाळेचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थी, पालक आणि शाळा परिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या दैदिप्यमान यशामागे विद्यार्थ्यांची अथक मेहनत, नियमित सराव, शिस्त, जिद्द आणि जिंकण्याची जिद्द कारणीभूत ठरली. शाळेचे संचालक कर्नल दिलीप परब आणि संचालक श्री. रिकीराज परब यांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे विद्यार्थ्यांना सर्वोत्तम प्रशिक्षण, आवश्यक सुविधा आणि स्पर्धात्मक वातावरण उपलब्ध झाले. तसेच विद्यार्थ्यांना क्रीडा प्रशिक्षक उस्मान शेख यांचे सातत्यपूर्ण, तांत्रिक आणि दर्जेदार मार्गदर्शन लाभले. तसेच या अभूतपूर्व यशाबद्दल विद्यालयाच्या संस्थापिका सौ. गिता परब, प्राचार्या कु. अर्पिता रणनवरे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी पदक विजेते विद्यार्थ्यांचे, प्रशिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन केले. राष्ट्रीय स्पर्धेतही विद्यार्थी यशाची ही सुवर्णपरंपरा कायम ठेवतील, असा विश्वास व्यक्त करत सर्वांना शुभेच्छा दिल्या.

कर्नल परब्स् स्कूलमध्ये शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा क्षेत्रालाही तितकेच महत्त्व दिले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या विद्यालयाने अल्पावधीतच राज्यस्तरावर आपला ठसा उमटविला असून, या ऐतिहासिक यशामुळे कर्नल परब्स् स्कूलच्या क्रीडा परंपरेत आणखी एका सुवर्ण अध्यायाची नोंद झाली आहे. या यशामुळे संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, शाळेचा गौरव अधिकच उंचावला आहे.

# सप्तशृंगी मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा उत्साहात

## गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वावर भक्तिमय वातावरणात लोकार्पण

नगर – शहरातील झेंडिगेट कामाठीपुरा जागृत देवस्थान असलेल्या श्री सप्तशृंगी माता मंदिराचा नूतनीकरण आणि जीर्णोद्धार सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात पार पडला. श्री शिवनारायण वर्मा जी यांच्या हस्ते या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला असून, गुरुपौर्णिमा निमित्त हे मंदिर पुन्हा एकदा सर्व भाविकांसाठी खुले करण्यात आले आहे.



झेंडिगेट कामाठीपुरा येथील श्री सप्तशृंगी माता मंदिराचा नूतनीकरण आणि जीर्णोद्धार पार पडल्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले झाले आहे.

यावेळी मंदिराच्या इतिहासाबद्दल माहिती देताना सांगण्यात आले की, हे मंदिर मूळचे त्र्यंबक महादेव मंदिर असून येथील मूर्तीची एक आगळीवेगळी कथा आहे. त्र्यंबक अण्णा कुंभारकर यांनी ही मूर्ती त्र्यंबकेश्वर येथील नदीतून प्राप्त केली होती. त्यांनी ही मूर्ती दक्षिणेकडून उचलून आणून येथे स्थापन केली. ही मूर्ती येथे आणण्यासाठी त्यांना सात दिवस लागले होते. तो कालावधी रामनवमी ते हनुमान जयंती हा होता. म्हणूनच आजही या मंदिरात रामनवमी ते हनुमान जयंती असे सात दिवसांचा भव्य उत्सव साजरा केला जातो.

या देवीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे चैत्र पौर्णिमेला या मंदिरातील मूळ मूर्ती गाभाऱ्यातून बाहेर काढली जाते आणि भाविकांना तिचे प्रत्यक्ष दर्शन घेता येते. यावेळी देवीची महा आरती करण्यात आली.या जीर्णोद्धार सोहळ्याला विजय गूगलवार, मयूर गूगलवार, सतीश गानला, राकेश गानला, शिवनारायण वर्मा, राजश्री वर्मा, बाली जोशी, गणेश कोंड्रा, विवेक कोंड्रा, रामदास कावट, ओम पांडे यांच्यासह शेकडो भाविक उपस्थित होते.

# संजीवनी कॉलनीत खंड्या (किंगफिशर) पक्ष्याचे दर्शन



नगर – रेल्वे स्टेशन – मल्हार चौक परिसरातील संजीवनी कॉलनीच्या ओपनस्पेसमध्ये खंड्या म्हणजेच किंगफिशर पक्ष्याचा मुक्त संचार आढळला असून पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील असलेला हा पक्षी आढळणे म्हणजे कॉलनीतील समृद्ध जैवविविधतेचे सकारात्मक संकेत मिळत असल्याची माहिती हरीभुमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी दिली.

दोन वर्षांपूर्वी शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून कॉलनीतील ओपनस्पेसला संरक्षक भिंत बांधण्यात आली होती. त्यानंतर पक्षी संवर्धनाच्या हेतूने चेरी फळांची ०९ व शंखासुराची १८ झाडे लावण्यात आली होती. त्यांची उत्तमपणे वाढ सुरू असून मोठ्या प्रमाणात चेरीची फळे व शंखासुराची फुले बहरू लागली आहेत. त्यामुळे येथे विविध प्रकारचे पक्षी व फुलपाखरे मुक्तपणे संचार करत आहेत. परिसराला बर्ड पार्कचे स्वरूप प्राप्त झाले असून ही बाब कॉलनीतील पर्यावरणीय समतोल व समृद्ध जैवविविधतेचे महत्त्वपूर्ण द्योतक मानली जाते. पक्षी संवर्धनासाठी तज्ञांच्या मार्गदर्शनानुसार आणखी प्रयत्न करण्यात येणार आहेत. ओपन स्पेस हरीत व विकसित करण्यासाठी कॉलनीतील ज्येष्ठ सदस्य श्रीकृष्ण लांडगे यांचे मार्गदर्शन व देखभालीसाठी कॉलनीतील सदस्य राजेंद्र बळे व पंकज शिपणकर यांचे सहकार्य लाभत असल्याचे अभय ललवाणी यांनी सांगितले.



संगीत परीक्षेत यश मिळवणारे एम एम निऱ्हाळी विद्यालयाचे विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक.

# एम एम निऱ्हाळी विद्यालयाचे संगीत परीक्षेत यश

पाथर्डी – अखिल भारतीय गांधर्व महामंडळ मुंबई यांच्या वतीने एप्रिल मे मध्ये घेण्यात आलेल्या संगीत परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये पाथर्डी शहरातील एम एम निऱ्हाळी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केलेले आहे. प्रीतम घुगे या विद्यार्थिनींनी विशेष योग्यता श्रेणी मिळून केंद्रामध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. या संगीत परीक्षेत एकूण ३० विद्यार्थी बसलेले होते

सर्व विद्यार्थी प्रथम व द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला आहे. प्रारंभिक गायनामध्ये समृद्धी आंधळे, समृद्धी क्षीरसागर, अवधूत खेडकर, श्री घुगे, प्रवेशिका प्रथम स्वप्नील बडे, वेदांत फुंदे, प्रज्ञा घुले, प्रवेशिका पूर्ण संदीप दहिफळे, श्रावणी भाबड, ओंकार खेडकर, या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाचे संगीत शिक्षक संगीत विशारद, प्रा. जनार्दन बोडखे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. या यशाबद्दल एकलव्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रतापराव ढाकणे, मा. जिल्हा परिषद सदस्या प्रभावती ढाकणे, विद्यालयाचे प्राचार्य संजय घिगे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी कौतुक केले आहे. शालेय अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यालयात अखिल भारतीय गांधर्व संगीत परीक्षेचा अभ्यासक्रम शिकविला जातो. शास्त्रीय गायन, सुगम संगीत, हार्मोनियम, तबला वादन, कथ्थक नृत्य आदी विषयाची तयारी करून घेतली जाते. शाळेचा हा स्तुत्य उपक्रम असल्याची प्रतिक्रिया यावेळी अनेक पालकांनी व्यक्त केली आहे.

# कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांसाठी रोजगार उपलब्ध करा

## जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांचे आवाहन; कौशल्य विकास समितीची बैठक संपन्न



कौशल्य विकास समितीच्या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

नगर – शासनाच्या विविध कौशल्य विकास योजनांच्या माध्यमातून प्रशिक्षण घेतलेल्या महिलांसाठी रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय यंत्रणांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

जिल्हाधिकारी डॉ.आशिया यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कौशल्य विकास समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. त्यावेळी डॉ.आशिया बोलत होते. यावेळी कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायकराव देशमुख, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त योगेश उगले, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय कदम, उमेदचे सोमनाथ जगताप, कृषी विज्ञान केंद्राचे एस. एस. कौशिक, कौशल्य विकास जिल्हा समन्वयक अमोल घोलप, माधुरी गवळी, संदीप हरमळकर (कामगार विभाग), विजय दळवी, सौरभ वाखारे, सुमित सोनवणे, बी.जे.पवार (शिक्षण विभाग), श्रीमती डी.बी.दौंड (जिल्हा उद्योग केंद्र) आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.पंकज आशिया म्हणाले, जिल्ह्यात कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांना व प्राधान्याने एकल महिलांना विविध विषयांचे प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणानंतर किती महिलांना रोजगार उपलब्ध झाला, याबाबत आढावा घेऊन जास्तीत जास्त महिलांना रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध करण्यावर शासकीय यंत्रणांनी आता भर द्यावा. औद्योगिक आस्थापनांनी अशा महिलांना प्राधान्याने रोजगार उपलब्ध करून द्यावा. त्यासाठी एम.आय.डी.सी.तील उद्योजकांच्या संघटनांना एकल महिलांची यादी उपलब्ध करुन देण्यात येईल.

यावेळी कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायकराव देशमुख म्हणाले, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील महिलांच्या सक्षमीकरण कार्यक्रमासाठी विशेष प्राधान्य देण्यात येत असून जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाने या कामाला मोठी गती मिळाली आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणांनी यात सहभागी होऊन एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रमाचे , राज्यात आदर्श ठरेल असे मॉडेल विकसित करावे, अशी अपेक्षा श्री. देशमुख यांनी व्यक्त केली.

प्रारंभी कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त योगेश उगले यांनी विविध कौशल्य विकास योजनांची माहिती देताना सांगितले, मागील वर्षी जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांच्या पुढाकाराने जिल्हा कारागृह अहिल्यानगर येथील ३३ कैद्यांना सोलर पी.व्ही. इन्स्टॉलेशन टेक्निशियन तर विसापूर कारागृहातील ३५ कायद्यांना दुचाकी दुरुस्तीचे प्रशिक्षण देण्यात आले. यावर्षी अहिल्यानगर येथील जिल्हा कारागृहातील २० बंदीजनांना योगा प्रशिक्षक व ३० बंदीजनांना डिजिटल मित्र चे प्रशिक्षण प्रस्तावित करण्यात आले आहे.

किमान कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम २०२६-२७ वर्षासाठी अभ्यासक्रम निश्चिती करण्यात आली असून मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांच्यामार्फत १६ जून २०२६ रोजी पर्यंत प्राप्त झालेल्या कोर्स मास्टर मधील १७ सेक्टर मधील ४१ अभ्यासक्रमांमध्ये २१६० उमेदवारांकरिता एकूण ४ कोटी ३५ लाख रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, अशी माहिती श्री. उगले यांनी यावेळी दिली. एप्रिल २०२५ पासुन आजपर्यंत जिल्ह्यात ४२ रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामाध्यमातून १२९७ उमेदवारांना रोजगार उपलब्ध झाला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. हाराष्ट्र शासनाने २२ जुलै २०२६ च्या आदेशानुसार अहिल्यानगर येथील मुलींकरता नवीन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यासाठी २७ नियमित पदे व १२ मनुष्यबळ सेवा बाह्य यंत्रणेकडून घेण्यास मान्यता दिली आहे. यासाठी विशेष प्रयत्न केल्याबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा., जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायकराव देशमुख यांच्या अभिनंदन ठराव या बैठकीत मंजूर करण्यात आला.




मलेशियातील जागतिक परिषदेसाठी हेल्थ प्लॅनर सविता बोठे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना एचडीएफसी एर्गो हेल्थ इन्शुरन्सच्या अहिल्यानगर शाखेचे अधिकारी.

# मलेशियातील जागतिक परिषदेसाठी हेल्थ प्लॅनर सविता बोठे यांची निवड

नगर – एचडीएफसी एर्गो हेल्थ इन्शुरन्सच्या वतीने मलेशिया येथे १ ते ५ ऑगस्ट दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय जागतिक परिषदेसाठी अहिल्यानगर येथील हेल्थ प्लॅनर तथा श्रीराम इन्शुरन्स सर्व्हिसेसच्या संचालिका सविता नितीन बोठे यांची निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विमा क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

या जागतिक परिषदेसाठी संपूर्ण भारतातून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मोजक्या विमा सल्लागारांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये अहिल्यानगरच्या सविता बोठे यांनी स्थान मिळवले आहे. परिषदेत जगभरातील विमा क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित राहून आरोग्य विमा क्षेत्रातील नव्या संकल्पना, आधुनिक सेवा, नवीन पॉलिसी, ग्राहकाभिमुख योजना तसेच कंपनीची भावी ध्येयधोरणे याविषयी सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. विविध तांत्रिक सत्रे, चर्चासत्रे आणि अनुभवांची देवाणघेवाण याद्वारे सहभागी प्रतिनिधींना आंतरराष्ट्रीय स्तरावरील ज्ञान मिळणार आहे.

या निवडीबद्दल एचडीएफसी एर्गो हेल्थ इन्शुरन्सच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने सविता नितीन बोठे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शाखेतील अधिकारी, विमा सल्लागार तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. सविता बोठे यांच्या या यशामुळे अहिल्यानगरच्या विमा क्षेत्राचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव झाला असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे कथा स्पर्धेचा निकाल जाहीर; राधेय सुपनेकर व शिल्पा ढोमणे यांच्या कथांना प्रथम क्रमांक

नगर – ज्ञानकौशल्य ट्रस्ट व श्रोता ऑडिओ बुक ॲप यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या 'साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे कथा स्पर्धा २०२६'चा निकाल अण्णा भाऊंच्या जयंती दिनाच्या पूर्वसंध्येला शुक्रवारी (दि. ३० जुलै) जाहीर करण्यात आला. या स्पर्धेला राज्यसह परदेशातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण १८३ कथाकार स्पर्धकांनी २०७ कथांसह यात सहभाग नोंदविला.

याबद्दल अधिक माहिती देताना समन्वयक व ट्रस्टच्या सचिव माधुरी चोभे यांनी सांगितले की, मराठीतील थोर साहित्यिक आणि विचारवंत म्हणून अण्णा भाऊ साठे यांची ओळख आहे. त्यामुळेच त्यांच्या स्मृतीला उजाळा देण्यासह नवीन कथाकार आणि लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून ही कथास्पर्धा आयोजित केली होती. महाराष्ट्र राज्यसह परदेशात स्थायिक असलेल्या मराठी भाषिक लेखकांनी यात सहभाग घेतला. त्यामुळे ही कथा स्पर्धा जागतिक पटलावर पोहचली. आयोजक म्हणून आम्हाला याचा आनंद आहे. स्पर्धेस उत्तम प्रतिसाद लाभला.

सर्व बक्षीसपात्र कथाकार यांना नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये होणाऱ्या साहित्य संमेलनात बक्षिसांचे वितरण करण्यात येणार आहे. बक्षीसपात्र कथा तसेच दर्जेदार आणि पात्र अशा सुमारे ५० कथांना श्रोता ऑडिओ बुक ॲप यावर विनामूल्य प्रसिद्ध केले जाणार आहे.

कथा स्पर्धा निकाल असा – पहिले बक्षीस (तीन हजार रुपये विभागून) – अदला-बदल (राधेय सुपनेकर, पाचपाखडी, ठाणे) व तुज यंत्र म्हणू की (शिल्पा ढोमणे, रामटेक, नागपूर), दुसरे बक्षीस (दोन हजार रुपये विभागून) – हट्टहास (गोपाळ रिठे, अमरावती) व शून्य तासाचा प्रवासी : महाकालचक्राचे रहस्य (दिनेश सुरेश भदाणे, वाघोली, पुणे), तिसरे बक्षीस (एक हजार रुपये विभागून) – एक वेगळी मैत्री (प्रितम शिंदे, राजगुरूनगर, पुणे) व तिचा वाडा (स्वाती देवधर सिंग, नौपाडा, ठाणे) आणि उत्तेजनार्थ बक्षीस (प्रत्येकी ५०० रुपये) – आमोशाचं कार्ट (एस. एस. नारायणे, खडकी, पुणे), पॅरलल युनिव्हर्स (मिलिंद अष्टपुत्रे, वडगाव बुद्रुक, पुणे), देशदूत (गिरीश देसाई, अमेरिका), जीवन-मृत्यूचा धागा (डॉ. राजश्री शिरभाते, इंग्लंड) व मरीबा (कविता ढोबळे, माळशिरस, सोलापूर).

# विश्वकर्मा सुतार संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी देवेंद्र दुधाले तर नगर शहराध्यक्षपदी विनायक क्षीरसागर यांची निवड



विश्वकर्मा वंशिय सुतार संघटनेच्या अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी देवेंद्र दुधाले तर शहराध्यक्षपदी विनायक क्षीरसागर यांची निवड करण्यात आली. यावेळी समाजाचे विभागीय प्रदेशाध्यक्ष राजकुमार राऊत, राज्य संघटक प्रसाद गडकर, जिल्हाध्यक्ष किरण मोरे आदी उपस्थित होते.

नगर – विश्वकर्मा वंशीय सुतार समाज संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच विभागीय प्रदेशाध्यक्ष राजकुमार राऊत, राज्य संघटक प्रसाद गडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व जिल्हाध्यक्ष किरण मोरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत सर्वानुमते अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी देवेंद्र दुधाले तर शहराध्यक्षपदी विनायक क्षीरसागर यांची निवड करण्यात आली. या निवडीनंतर सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मान करून अभिनंदन करण्यात आले.

या बैठकीत शहर कार्यकारिणीत अमृत क्षीरसागर, रामदास सुरंकर, संतोष नगरकर, बाणेश्वर कलमदाने, योगेश दुधाले, अरूण जमदाड, महादेव उनवणे, गोकुळ कलमदाने, संतोष कलमदाने, राजेंद्र सोनवणे, श्री.झेलकर, राम तांबट, लक्ष्मण तांबट, शंकर कलमदाने, वैभव दुधाले, आबासाहेब शिंदे आदींच्या विविध पदांवर एकमताने नियुक्त्या करण्यात आल्या.

यावेळी समाजातील भाऊसाहेब राऊत, भगवान राऊत, रावसाहेब मोरे, गणेश सोनवणे, आदिनाथ भालेकर, अशोक गोरे, सुभाष तमानके, गोकुळ गाडेकर, संतोष शेंडगे, युवराज दुधाले, रविंद्र मोरे, प्रभाकर राऊत, भानुदास वाघ, दत्तात्रय काळे, संचित प्रधान, सतीश भालेकर, गणेश शेलार, शिवप्रसाद बोरुडे, उद्योजक शेटे, सुनिल लोंढे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

नूतन जिल्हाध्यक्ष देवेंद्र दुधाले म्हणाले, विश्वकर्मा वंशीय सुतार समज संघटित होण्यासाठी जिल्हाध्यक्ष म्हणून प्राधान्य देणार आहे. समाजाचे प्रलंबित प्रश्न, नागरिकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी पाठपुरावा करू. समाजातील सर्व घटकांना व पदाधिकाऱ्यांना बरोबर घेत काम करू, असा विश्वास व्यक्त केला.

# आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत उल्लेखनीय यश

नगर – माय एफ.एम. आयोजित 'रंगरेज' राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत आयकॉन पब्लिक स्कूलच्या २ विद्यार्थ्यांनी आपल्या अप्रतिम कलागुणांच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन करत अहिल्यानगर जिल्ह्याचा मान उंचावला आहे. शाळेतील तनिष्का देसरडा (इ. ९ वी) आणि असदखान पठाण (इ. ८ वी हे विद्यार्थी अहिल्यानगर जिल्ह्यातून विजेते ठरले असून, त्यांची राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली येथे विशेष भेटीसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांचा शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

शाळेचे कलाशिक्षक भारत पवार व अश्विनी पुणतांबेकर यांच्या प्रेरणादायी प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर आपली कलात्मक प्रतिभा सिद्ध करत शाळेचे आणि जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले. आयकॉन पब्लिक स्कूलच्या संस्थापिका मंगला मुथा, अध्यक्ष अशोक मुथा, विश्वस्त निर्मल मुथा, अमित मुथा, डायरेक्टर कर्नल आर. सी. राणा, डायरेक्टर आराधना राणा, मुख्याध्यापिका दीपिका नगरवाला तसेच शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थी, पालक व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.




राज्यस्तरीय स्केटिंग मॅरेथॉन स्पर्धेत यश मिळविणारे ज्ञानसंपदा स्कूलचे विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक.

# राज्यस्तरीय स्केटिंग मॅरेथॉन स्पर्धेत ज्ञानसंपदा स्कूलचे यश

## अहिल्यानगर जिल्ह्यास मिळविली मानाची प्रथम ट्रॉफी

नगर – बारामती येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय स्केटिंग मॅरेथॉन स्पर्धेत ज्ञानसंपदा स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट कौशल्य, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन करत सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांची लक्षणीय कमाई केली. महाराष्ट्रातील तब्बल २७ जिल्ह्यांतील खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. अत्यंत चुरशीच्या या स्पर्धेत ज्ञानसंपदा स्कूलच्या १५ विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत आपल्या शाळेचा आणि अहिल्यानगर जिल्ह्याचा नावलौकिक उंचावला.

विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशामुळे अहिल्यानगर जिल्ह्याला मानाची प्रथम क्रमांकाची विजेती ट्रॉफी प्राप्त झाली. या अभिमानास्पद यशाने अहिल्यानगरचे नाव महाराष्ट्राच्या क्रीडा इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले.

या दैदिप्यमान यशाबद्दल ज्ञानसंपदा स्कूलच्या प्राचार्या शिवांजली अकोलकर यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या भावी क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच या यशामागे मॅरेथॉन स्केटिंग नगरचे अध्यक्ष गोरक्ष धात्रक यांचे लाभलेले प्रेरणादायी मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रशिक्षण महत्त्वाचे ठरल्याचे त्यांनी नमूद केले. ज्ञान, संस्कार आणि गुणवत्तेसोबतच क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांना उत्कृष्टतेच्या शिखरावर नेण्याचा ज्ञानसंपदा स्कूलचा संकल्प या यशामुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाला असून, शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षात या यशाने आणखी एका मानाच्या सुवर्णपानाची भर पडली आहे.

# महापालिका सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या कार्याध्यक्षपदी दिनकर देशमुख यांची निवड



नगर– महापालिका सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या कार्याध्यक्षपदी दिनकर देशमुख यांची निवड करण्यात आली. महानगरपालिका व नगरपालिका सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेची सभा कास्ट्राईब संघटनेच्या कार्यालयात संघटनेची बैठक होऊन यामध्ये दिनकरराव देशमुख यांची निवड करण्यात आली यावेळी संघटनेचे अध्यक्ष एन एम पवळे, उपाध्यक्ष वसंत थोरात, उपाध्यक्ष मिलिंद वैद्य, चिटणीस आर के गावडे, खजिनदार डी एम डेपाळ यासह संस्थेचे कार्यकारणी सदस्य उपस्थित होते.

# प्रियदर्शनी शाळेत गुरुपौर्णिमा उत्सव आणि ध्वजसंचालन सोहळा साजरा



प्रियदर्शनी शाळेत गुरुपौर्णिमा उत्सव आणि ध्वजसंचालनास उपस्थित पोलीस उपनिरीक्षक उमेश परदेशी, राहील शेख आदी.

नगर – महर्षी व्यास यांच्या स्मरणार्थ गुरुपौर्णिमा साजरी केली जाते. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे ध्वजसंचालन आणि बॅजेस प्रदान करण्याचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपनिरीक्षक उमेश परदेशी, सायबर एक्स्पर्ट राहील शेख उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवराच्या हस्ते महर्षी व्यास यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये गुरुंविषयी आदर आणि ध्येयप्राप्तीसाठी गुरूंचा आशीर्वाद खूप महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन श्री. परदेशी यांनी केले, तसेच राहील शेख यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सायबर गुन्हेगारीपासून दूर राहणे आवश्यक असल्याचे सांगितले तसेच पोस्को ॲक्ट बद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या दिमाखदार अशा ध्वज संचलनाने मान्यवरांना मानवंदना देण्यात आली व त्यांच्या हस्ते मतदानाने निवडलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रतिनिधींना बॅजेस प्रदान करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना माननीय श्री परदेशी साहेब यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये भविष्यात यशस्वी होण्यासाठी आणि ध्येय व लक्ष निश्चित करण्यासाठी एकाग्रता, मैदानी खेळ, शारीरिक व्यायाम, संतुलित आहार, आणि अभ्यास व कष्ट हे आवश्यक असते, तसेच गुन्हेगारी प्रवृत्ती आणि मोबाईलपासून दूर राहण्याचा मौलिक सल्ला देखील दिला.

याप्रसंगी अध्यक्ष बाळासाहेब खोमणे, शाळेच्या प्राचार्या श्रीमती अंजली बोधक, उपप्राचार्य अमोल घोरपडे, पर्यवेक्षिका अनिता थापा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व क्रीडा शिक्षक उपस्थित होते.

ध्वजासंचालना करिता क्रीडाशिक्षक आशिष भिंगारदिवे, अल्ताफ खान, शुभम कर्पे, सागर फाटके, हनुमंत दळवी यांनी विशेष मार्गदर्शन घेतले.




के. जी. कॉलेज आर्ट्स अ‍ॅण्ड कॉमर्स महाविद्यालयात गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

# महाविद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

नगर – के. जी. कॉलेज आर्ट्स अ‍ॅण्ड कॉमर्स महाविद्यालयात गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम उत्साहात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत तसेच परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गुरुंच्या महत्त्वावर मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाच्या परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत यांनी भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व स्पष्ट करत विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार आणि मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत यांनी विद्यार्थ्यांना गुरुंच्या मार्गदर्शनातून उज्ज्वल भविष्य घडवावे, असा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रोहिणी क्षीरसागर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. वर्षा कीर्तने यांनी मानले.

यावेळी प्रा. स्नेहल बोरावके, प्रा. योगेश चाकोते, तसेच सौ. हर्षाली रासकर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# पावसाच्या सरी आणि संवेदनशीलतेची ऊब

## 'स्नेहबंध'तर्फे फूटपाथवरील गरजूंच्या हाती छत्र्या



शहरातील विविध भागांत फूटपाथ व रस्त्यावर राहणाऱ्या गरीब, गरजू व अनाथ नागरिकांना छत्रीचे वाटप करताना 'स्नेहबंध'चे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे व सहकारी.

नगर – पावसाळ्यात फूटपाथ, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर जीवन जगणाऱ्या गरीब, गरजू व अनाथ नागरिकांना पावसापासून संरक्षण मिळावे, या भावनेतून 'स्नेहबंध सोशल फौंडेशन'च्या वतीने शहरात छत्री वाटपाचा उपक्रम राबवण्यात आला. स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम पार पडला.

या उपक्रमांतर्गत शहरातील मार्केट यार्ड, आनंदधाम, माळीवाडा, नगर बस स्टँड, स्वस्तिक चौक, दिल्लीगेट तसेच सावेडी परिसरातील फूटपाथ व रस्त्यांवर वास्तव्यास असलेल्या गरजूंना प्रत्यक्ष भेटून छत्र्यांचे वाटप करण्यात आले. ऐन पावसाच्या दिवसांत छत्री मिळाल्याने पावसात भिजणाऱ्या निराधारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी इंजि. अभिजीत ढाकणे, हेमंत ढाकेफळकर, निखिल नरवणे, प्रतीक डहाळे, स्वयंम बारस्कर आणि प्रथमेश राठोड यांनी प्रत्यक्ष उतरून सहभाग नोंदवला.


पावसाळ्यात फूटपाथ आणि रस्त्यावर राहणाऱ्या बांधवांना पावसाचा मोठा सामना करावा लागतो. अशा गरजू व्यक्तींना आधार अन् सुरक्षितता मिळावी, या भावनेतून आम्ही हा उपक्रम हाती घेतला. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवणे हाच आमचा उद्देश आहे. भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबवले जातील, असे स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी सांगितले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## आधुनिक मानवाबाबत नवं संशोधन

सुमारे २५०० मानवी जीनोमच्या एका नवीन अभ्यासाने आधुनिक मानव ऑस्ट्रेलियात कधी पोहोचला, याबद्दलचा दीर्घकाळ चाललेला वाद संपुष्टात आणला आहे. ओशियानियातील प्राचीन आणि समकालीन आदिवासी लोकांच्या डीएनएमधून तयार केलेल्या एका विशाल डेटाबेसचा वापर करून संशोधकांनी असा निष्कर्ष काढला आहे की, लोकांनी सुमारे ६०,००० वर्षांपूर्वी उत्तर ऑस्ट्रेलियात वस्ती करायला सुरुवात केली आणि ते दोन वेगवेगळ्या मार्गांनी तिथे पोहोचले.



ऑस्ट्रेलियात आधुनिक मानवाचे पहिले पाऊल कधी पडले, हा तज्ज्ञांमध्ये नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. ऑस्ट्रेलियात पोहोचण्यासाठी जलवाहतुकीच्या साधनांचा शोध लागणे आवश्यक होते. काही संशोधकांनी ४७,००० ते ५१,००० वर्षांपूर्वीच्या 'लघु कालगणनेला' जनुकीय मॉडेलद्वारे पाठिंबा दिला होता, तर इतरांनी ६०,००० ते ६५,००० वर्षांपूर्वीच्या 'दीर्घ कालगणनेला' पुरातत्त्वीय पुरावे आणि आदिवासींच्या माहितीच्या आधारावर समर्थन दिले होते. 'सायन्स ॲडव्हान्सेस' जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या या नवीन अभ्यासात, संशोधकांनी २,४५६ मानवी जीनोमचा 'अभूतपूर्व मोठा' डेटासेट विश्लेषित केला.

यातून सुंदा (प्राचीन भूभाग, ज्यात आजचा इंडोनेशिया, फिलिपाईन्स आणि मलेशियाई द्वीपकल्प समाविष्ट होता) पासून साहुल (एक पेलिओकॉन्टिनेंट, ज्यात आधुनिक ऑस्ट्रेलिया, टास्मानिया आणि न्यू गिनी समाविष्ट होते) पर्यंत मानवाचा प्रवास कधी झाला, या प्रश्नाचे उत्तर शोधले. युकेमधील युनिव्हर्सिटी ऑफ हडर्सफिल्डचे पुरातत्त्व जनुकीय तज्ज्ञ आणि या अभ्यासाचे सह-लेखक मार्टिन रिचर्डसब यांनी सांगितले, 'हा प्रश्न सोडवणारा हा आजपर्यंतचा सर्वात व्यापक जनुकीय अभ्यास आहे आणि तो लघू कालगणनेऐवजी दीर्घ कालगणनेला जोरदार समर्थन देतो.' संशोधकांच्या विश्लेषणातून हे देखील समोर आले की, लोक उत्तर आणि दक्षिण अशा दोन वेगवेगळ्या मार्गांनी ऑस्ट्रेलियात आले. रिचर्डसब म्हणाले, 'हा निष्कर्ष सुमारे ६०,००० वर्षांपूर्वी साहुलमध्ये प्रवेश झाल्याच्या पुरातत्त्वीय आणि समुद्रविज्ञान/पुरातन हवामान पुराव्यांशी पूर्णपणे जुळतो.' संशोधकांनी त्यांच्या निष्कर्षांवर पोहोचण्यासाठी 'मॉलिक्युलर क्लॉक' पद्धत वापरली. यात माइटोकॉन्ड्रियल डीएनए आणि वाय-क्रोमोसोम डेटाचे विश्लेषण करण्यासाठी अनेक सांख्यिकीय पद्धतींचा उपयोग करण्यात आला. दक्षिणी मार्ग : लोकांचा एक गट दक्षिणी सुंदा (इंडोनेशियाई बेटे) मार्गे ऑस्ट्रेलियात पोहोचला.

## शोध ५७३ प्राचीन किल्ल्यांचा

चीनच्या शांक्सी प्रांतातील यूलीन शहराजवळील डोंगराळ भागात पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी एक मोठा आणि महत्त्वाचा शोध लावला आहे. त्यांना या परिसरात दगडांनी बांधलेल्या किल्ल्यांसारख्या ५७३ प्राचीन मानवी वस्त्यांचे अवशेष सापडले आहेत. यापैकी अनेक किल्ले सुमारे २८०० ईसा पूर्व म्हणजेच जवळपास ५,००० वर्षांपूर्वीचे असल्याचे मानले जात आहेत. यामुळे एका प्राचीन सभ्यतेच्या खुणा मिळाल्या आहेत.

या किल्ल्यांपैकी काही अवशेष यांगशाओ काळातील आहेत, जो २८०० ईसा पूर्व पासून सुरू होतो. याशिवाय, काही किल्ले शांग राजवंशाच्या (१६०० ते १०४६ ईसा पूर्व) आणि झोउ राजवंशाच्या (१०४६ ते २२१ ईसा पूर्व) काळातले देखील आहेत. हा शोध चीनमधील जुना समाज आणि त्यांच्या राहणीमानाची पद्धत समजून घेण्यासाठी मदत करेल. पुरातत्त्व चमूने या संपूर्ण भागात सुमारे सहा वर्षे संशोधन केले. प्राचीन काळात लोक पाण्याच्या जवळच वस्ती करत असल्याने, चमूने नदी आणि पाण्याच्या स्रोतांभोवती शोध सुरू केला.

पाण्याचे मार्ग दर्शवणारे नकाशे आणि ड्रोनचा वापर करून या वस्त्यांचा शोध लावण्यात आला. या सर्व वस्त्या दगडांनी वेढलेल्या होत्या, यावरून हे स्पष्ट होते की, येथील लोक सुरक्षेबद्दल खूप जागरूक होते. काही ठिकाणी दगडांच्या भिंतींनी वेढलेले मोठे किल्ले सापडले, तर जवळच भिंती नसलेल्या सामान्य लहान वस्त्या देखील मिळाल्या. यावरून हे सूचित होते की, मोठे किल्ले समाजाचे केंद्रस्थान होते आणि छोटे गावे त्यांच्यावर अवलंबून राहत होते. या ५७३ किल्ल्यांचा आकार आणि रचना एकमेकांपेक्षा वेगळी आहे. काही किल्ले खूप साधे होते, तर काहीमध्ये आत अनेक भाग आणि खोल्या बनवलेल्या होत्या.



संशोधकांचे म्हणणे आहे, बांधकामातील हा फरक दर्शवतो की, वेळेनुसार बांधकामाची पद्धत आणि संस्कृती बदलत गेली. तसेच, यातून त्या समाजात उच्च-नीच दर्जाची सामाजिक व्यवस्था अस्तित्वात असल्याचेही दिसून येते. हा शोध चीनमधील प्राचीन संस्कृतींना समजून घेण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. पाण्याजवळ वसवलेल्या या किल्ल्यांवरून युद्ध, सुरक्षा आणि समाजाच्या विकासात किल्ल्यांची काय भूमिका होती, हे स्पष्ट होण्यास मदत होईल. तज्ज्ञांचा विश्वास आहे की, हा शोध चीनच्या इतिहासातील अनेक रहस्ये उलगडेल आणि त्या वेळी वापरल्या जाणाऱ्या संरक्षण व्यवस्था व नगर वसवण्याच्या तंत्रज्ञानाची माहिती देईल.

## अंतराळ स्थानकातील महत्त्वाचे प्रयोग

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक (ISS) गेल्या २५ वर्षांपासून पृथ्वीवरील विज्ञान आणि तंत्रज्ञानाला नव्या शिखरावर घेऊन गेले आहे. पृथ्वीच्या खालच्या म्हणजेच पृथ्वीपासूनच अगदी जवळच्या कक्षेतील या स्थानकावरील ४,००० हून अधिक प्रयोगांचे निकाल आता आपल्या रुग्णालये, शहरे आणि शेतीत दिसून येत आहेत. गुरुत्वाकर्षण कमी किंवा नगण्य असलेल्या वातावरणात असे प्रयोग करणे शक्य होते, जे पृथ्वीवर करणे कठीण आहे. या प्रयोगांमुळे विविध क्षेत्रांना फायदा झाला आहे. या रौप्यमहोत्सवी अंतराळ स्थानकावरील प्रयोगांचे थेट मानवी जीवनामध्ये कोणते सहाय्य होत आहे त्याची ही माहिती...

**आरोग्य आणि वैद्यकीय क्रांती:** मानवी शरीर आणि आरोग्य



माइक्रोसॉव्हिटीमध्ये म्हणजेच कमी गुरुत्वाकर्षणात हाडे आणि स्नायू वेगळ्या पद्धतीने वागतात. खडड वर केलेल्या अभ्यासांमुळे वाढते वय, हृदयावरील ताण आणि हाडांची कमजोरी यांसारख्या समस्या समजून घेण्यास मदत मिळाली आहे.

**नवीन उपकरणे :**

Myotone Pro : अंतराळवीरांच्या स्नायूंचे मापन करणारे हे आरोग्य उपकरण आता पृथ्वीवरही स्नायूंच्या समस्या लवकर ओळखण्यास मदत करते.

**अल्ट्रासाऊंड प्रणाली :** येथे लहान अल्ट्रासाऊंड प्रणालीची चाचणी झाली, जी आता आपत्कालीन परिस्थिती आणि दुर्गम भागातील क्लिनिकमध्ये वापरली जात आहे.

**सुधारित सुरक्षा आणि उत्पादन:**

**अग्निसुरक्षा** : अंतराळात द्रव, आग आणि पदार्थ वेगळ्या प्रकारे वागतात. खडड वर आग कशी पसरते यावर केलेल्या अभ्यासातून आता विमाने, कारखाने आणि उंच इमारतींसाठीचे अग्निसुरक्षा मॉडेल सुधारले आहेत.

**उत्पादन तंत्रज्ञान** : ३डी प्रिंटिंगच्या प्रयोगांनी भविष्यातील लांब अंतराळ प्रवासांसाठी धातूची उपकरणे बनवण्यास मदत केली आहे.

**शाश्वत तंत्रज्ञान :**

**पाणी पुनर्वापर प्रणाली:** ISS वर पाण्याच्या कमतरतेमुळे एक पुनर्वापर प्रणाली विकसित करण्यात आली, जी पाण्याचा वापर ६५ टक्क्यांपर्यंत कमी करते. हे तंत्रज्ञान आता पाण्याची अनियमितता असलेल्या खेड्यांमध्ये वापरले जात आहे.

**स्वच्छ हवा:** हवा साफ करणे आणि आर्द्रता नियंत्रित करण्याच्या अभ्यासातून आता रुग्णालये, कार्यालये आणि कारखान्यांमधील व्हेंटिलेशन सिस्टम सुधारण्यास मदत मिळाली आहे.

**शेती आणि पर्यावरण निरीक्षण :**

**अंतराळात शेती:** २०१५ मध्ये अंतराळवीरांनी प्रथमच अंतराळात पिकवलेल्या सॅलडची चव घेतली. खडड वर प्रकाश आणि रासायनिक संकेतांद्वारे वनस्पतींच्या वाढीचा अभ्यास करण्यात आला आहे, ज्यामुळे ऊर्जा वाचवणाऱ्या पिकांची शेती आणि शहरी शेतीचे मार्ग सुधारले आहेत.

**आपत्कालीन व्यवस्थापन:** ISS वरून पृथ्वीचे दृश्य सतत उपलब्ध असते. वादळे, आग, ज्वालामुखी आणि भूकंप यांसारख्या घटनांची छायाचित्रे आपत्कालीन व्यवस्थापनात मदत करतात. उदाहरणार्थ, २०१० मध्ये चिलीमध्ये ३३ खाण कामगार अडकले असताना, छअडअ च्या सल्ल्याने त्यांचे जीव आणि आरोग्य सुरक्षित ठेवण्यास मोठी मदत झाली होती.


## येथील ३० वर्षीय डेव्हिन...

## नऊ लाखांची नोजसर्जरी

येथील ३० वर्षीय डेव्हिन ऐकेनने तिचे आयुष्य बदलण्यासाठी एक मोठे पाऊल उचलले. नोव्हेंबर २०२४ मध्ये तिने आपल्या नाकाची सर्जरी (राइनोप्लास्टी) केली, ज्यासाठी अंदाजे ११,००० डॉलर्स (९ लाख रुपये) खर्च आला. या सर्जरीमुळे फक्त तिच्या नाकाचा आकारच बदलला नाही, तर तिचा आत्मविश्वासही वाढला. ऐकेन म्हणाली की, सर्जरीनंतर ती तिच्या सर्वात मोठ्या असुरक्षिततेतून मुक्त झाली आणि तिच्या सात वर्षांच्या दुःखी वैवाहिक जीवनाचा शेवट झाला.

सर्जरीनंतर ऐकेनला वाटलं की, तिचा आत्मविश्वास पूर्वीपेक्षा जास्त वाढला आहे. तिने सोशल मीडियावर तिच्या परिवर्तनाची गोष्ट शेअर केली, जी थोड्याच वेळात जोरदार व्हायरल झाली. तिचा व्हिडीओ टिकटॉकवर ४.५ मिलियनहून अधिक वेळा पाहिला गेला. ऐकेन म्हणाली की, 'मला आता खूप आनंद होत आहे आणि मला माहीत आहे की, मी माझं उर्वरित आयुष्य आनंदाने जगू शकते.'

डेव्हिन ऐकेनचं जीवन सोपं नव्हतं. शाळेत असताना तिच्या नाकामुळे तिच्या वर्गमित्रांकडून तिची थट्टा केली जात असे. तिला त्रास दिला जात असे आणि टोमणे मारले जात होते, ज्यामुळे तिच्या आत्मविश्वासावर परिणाम झाला आणि ती नैराश्यात गेली. यामुळे तिने २३ व्या वर्षी घाईघाईने रिलेशनशिपमध्ये आली, जे नंतर तिच्यासाठी एक ओझं बनलं. तिने स्पष्ट केलं की, तिच्या पतीला तिचं नाक आवडत होतं. परंतु, सतत वाद आणि मतभेदांमुळे नात्यात तणाव होते.




सर्जरीनंतर, डेव्हिनला वाटलं की, आता लग्नाचं नातं संपवण्याची वेळ आली आहे.

तिने घटस्फोट घेतला. त्यानंतर ती आता तिच्या नवीन नाकासह आणि स्वातंत्र्याने तिचं जीवन जगत आहे. ती आता डेट करत आहे आणि पूर्णपणे आनंदी जीवन जगत आहे. तिच्या फॉलोअर्सनी तिच्या सौंदर्याची तुलना बेला हदीद आणि सेलिन डायनसारख्या सेलिब्रिटींशी केली आहे.

## जगातील सर्वात उंच पुरुष...


पूर्व आफ्रिकेतील डिंका समुदायाचे पुरुष त्यांच्या उंचीमुळे जगभर ओळखले जातात. दक्षिण सुदानमध्ये राहणारी ही जनजाती, रवांडातील तुत्सी लोकांसह, आफ्रिका खंडातील सर्वात उंच लोकसमूह मानली जाते. त्यांच्या या उल्लेखनीय उंचीमुळे या प्रदेशाला अनेकदा 'लँड ऑफ जायंटस्' असेही संबोधले जाते.

डिंका समुदायातील पुरुषांची सरासरी उंची खूप जास्त आहे. १९५३-१९५४ मध्ये केलेल्या एका अभ्यासानुसार, डिंका पुरुषांची सरासरी उंची सुमारे १८२.६ सेंटिमीटर (५ फूट ११.९ इंच) नोंदवली गेली होती. ही आकडेवारी जागतिक स्तरावर सर्वात जास्त उंची असलेल्या लोकसंख्येमध्ये गणली जाते. डिंका लोक हे प्रामुख्याने निलोटिक वंशीय लोक आहेत. त्यांची उंची वाढण्यामागे अनेक घटक कारणीभूत असल्याचे मानले जाते: उत्कृष्ट जनुके : त्यांच्या वंशामध्ये उंचीसाठी जबाबदार जनुके मोठ्या प्रमाणात आहेत.



आहार आणि पोषण: डिंका लोकांची पारंपरिक जीवनशैली पशुपालनावर आधारित आहे. त्यांच्या आहारात दूध, मांस आणि धान्य यांचा भरपूर समावेश असतो, जो त्यांना वाढीसाठी आवश्यक पोषक तत्त्वे पुरवतो. पर्यावरणाशी जुळवून घेणे: काही तज्ज्ञांचे मत आहे की, उष्ण वातावरणात शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी (हायपरथर्मिया टाळण्यासाठी) निसर्गाने त्यांना लांब पाय दिले आहेत. जागतिक स्तरावर ओळख: डिंका जमातीच्या काही सदस्यांनी त्यांच्या उंचीमुळे जागतिक स्तरावर ओळख मिळवली आहे.

यामध्ये अमेरिकेच्या नॅशनल बास्केटबॉल असोसिएशन मध्ये खेळलेला सर्वात उंच खेळाडूंपैकी एक, मानुट बोल यांचा समावेश आहे. त्यांची उंची ७ फूट ७ इंच होती आणि ते डिंका जमातीतील होते. सध्याच्या काळात, दक्षिण सुदानमधील संघर्ष आणि पोषण कमी झाल्यामुळे डिंका पुरुषांच्या सरासरी उंचीमध्ये थोडी घट झाल्याचे काही अभ्यासातून दिसून आले आहे (१९९५ च्या एका अभ्यासात सुमारे १७६.४ सेंमी). तरीही, जगातील सर्वात उंच लोकसमूहांपैकी एक म्हणून त्यांची ओळख आजही कायम आहे.



## डेटा नसतानाही पाहता येणार लाईव्ह स्ट्रीमिंग

मोबाईल ब्रॉडबँड नेटवर्कवर अवलंबून न राहता थेट मोबाईलवर व्हिडीओ, डेटा आणि ओटीटी सेवा मिळवण्याचे डायरेक्ट-टू-मोबाईल (डी टू एम) तंत्रज्ञान भारतात मोठी क्रांती घडवण्याची शक्यता आता निर्माण झाली आहे. प्रसार भारतीने सध्याच्या पायाभूत सुविधा आणि दूरसंचार कंपन्यांच्या मोबाईल टॉवर्सचा वापर करून हे अत्याधुनिक २ तंत्रज्ञान उपकरणे देशभर तयार करण्याची योजना आखली आहे. यामुळे साध्या मोबाईल फोनमध्ये डेटा विनाच लाईव्ह कॉंटेंट, ओटीटी स्ट्रीमिंकसारखा अनुभव सहजगत्या घेता येणार आहे.

उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञाच्या अंदाजानुसार, देशभरात २ नेटवर्क सुरू करण्यासाठी सुमारे २८,००० कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक आवश्यक असेल. ग्राहकांच्या वाढीनुसार ही गुंतवणूक पुढील टप्प्यात वाढवली जाऊ शकते. या सेवेसाठी प्रसार भारतीला देण्यात आलेल्या स्पेक्ट्रमचा वापर करणे शक्य आहे. या विशेष तंत्रज्ञानामुळे मोबाईल नेटवर्कवर अवलंबून न राहता थेट मोबाईलवर कंटेंट उपलब्ध होईल. त्यामुळे डेटा वापर कमी होईल आणि परिणामी, दूरसंचार कंपन्यांचे डेटा उत्पन्न घटू शकते, अशी भीती त्यांना वाटत आहे. यामुळे दूरसंचार कंपन्या २ तंत्रज्ञानाविरुद्ध सावध भूमिका घेत आहेत आणि अशा सेवांसाठी बाजारभावाने स्पेक्ट्रम उपलब्ध करून देण्यासाठी सरकारवर दबाव आणत आहेत. द इकोनॉमिक्स टाईम्सने याबाबतचे वृत्त प्रसिद्ध केले आहेत.

सहा महिन्यांत एकोणीस शहरांत चाचण्या

या तंत्रज्ञानाच्या चाचण्या सध्या दिल्ली आणि बंगळूर येथे घेण्यात आल्या आहेत. पुढील ६ ते ९ महिन्यांत १९ शहरांमध्ये प्रसार भारतीच्या पायाभूत सुविधांचा वापर करून व्यावसायिक चाचण्या सुरू करण्याचे नियोजन आहे. त्यानंतर हे तंत्रज्ञान संपूर्ण भारतात आणले जाईल. माहिती आणि प्रसारण मंत्रालय हे तंत्रज्ञान आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. मात्र, त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागल्याचे समोर आले आहे.

सध्या फोन उत्पादन क्षेत्रातील दोन कंपन्या पुढे आल्याने प्रक्रियेला वेग मिळण्याची अपेक्षा आहे. फीचर फोनचे प्रोटो-टाईप तयार आहेत आणि देशभरात सेवा उपलब्ध झाल्यावर मोठ्या प्रमाणात उत्पादन सुरू होऊ शकते, असे मत उद्योजक गौतम धिंग्रा यांनी व्यक्त केले. एका फोन उत्पादक कंपनीचे सीएमओ संजीव अग्रवाल यांनी सांगितले की, आम्ही २००० ते २२०० च्या श्रेणीत सहा महिन्यांच्या कालावधीत फीचर फोन मॉडेल बाजारात आणण्यासाठी तयारी करत आहोत.

## व्हॉटस्ॲप युजर्सचा डेटा धोक्यात का?

सुमारे३.५ अब्जाहून अधिक व्हॉटस्ॲप वापरकर्त्यांचे फोन नंबर धोक्यात आहेत. एका मोठ्या सुरक्षा भेद्यतेमुळे वापरकर्त्यांचे प्रोफाईल चित्र, स्टेटस आणि अबाऊट सेक्शन तपशील लीक होऊ शकतात. व्हिएन्ना विद्यापीठातील संशोधकांनी ही भेद्यता शोधून काढली.

संशोधकांच्या मते, या दोषामुळे कोणीही व्हॉटस्ॲपवर नंबर सक्रिय आहे की, नाही हे पडताळू शकतो. त्यानंतर प्रोफाईल पिक्चर, स्टेटस आणि अबाऊट सेक्शनसारखे तपशील सहजपणे




काढले जाऊ शकतात, ज्यामुळे गैरवापर होण्याची शक्यता असते. संशोधकांनी सांगितले की, ही समस्या व्हॉटस्ॲपच्या कॉंटॅक्ट डिस्कव्हरी फीचरमध्ये आहे. वापरकर्त्यांच्या फोन ॲड्रेस बुक सिंक करून लोकांना शोधणे सोपे करण्यासाठी हे वैशिष्ट्य डिझाईन केले होते. परंतु, त्यामुळे अनवधानाने वापरकर्त्यांच्या डेटाच्या मोठ्या प्रमाणात वापराचे दरवाजे उघडले.


संशोधकांनी सांगितले की, ३.५ अब्ज किंवा ३.५ अब्ज वापरकर्त्यांपैकी, भारतात सर्वाधिक ७४.९ कोटी (२१.६७%), इंडोनेशियामध्ये २३.५ कोटी (६.८१%), ब्राझीलमध्ये २०.७ कोटी (५.९९%), अमेरिकेत १३.८ कोटी (३.९९%) आणि रशियामध्ये १३.३ कोटी (३.८४%) खाती आहेत. व्हिएन्ना विद्यापीठातील संशोधकांनी २४५ देशांसाठी वास्तववादी फोन नंबर तयार करण्यासाठी टूलचा वापर केला. त्यानंतर त्यांनी व्हॉटसॲप ॲपच्या प्रोटोकॉलशी कनेक्ट केले आणि प्रश्न पाठवले.

या संशोधनात ५ खात्यांमधील ६३ अब्ज संभाव्य संख्या तपासल्या गेल्या. याचा परिणाम म्हणजे ताशी १०० दशलक्ष या वेगाने ३.५ अब्ज सक्रिय खाती निर्माण झाली. ५६.७% वापरकर्त्यांचे प्रोफाईल फोटो आणि २९.३% वापरकर्त्यांचे मजकूर उघड झाले. या मजकुरात राजकीय विचार, धर्म किंवा इतर सोशल मीडिया लिंक्सचा समावेश होता.

## 'झूम'च्या यशाची 'प्रेमकहाणी'

आज 'झूम' हे जगात सर्वाधिक लोकप्रिय व्हिडीओ कॉन्फरन्सिंग प्लॅटफॉर्मपैकी एक आहे. पण, याच्या प्रचंड यशाची मुळं एका प्रेम कहाणीत दडलेली आहेत. संस्थापक एरिक युआन यांच्या तारुण्यातील एका प्रेम कथेनेच ती कल्पना जन्माला घातली, जी पुढे 'झूम'ला जगातील सर्वात मोठं व्हिडिओ कॉन्फरन्सिंग प्लॅटफॉर्म बनवून गेली.

चीनच्या एका कॉलेजमध्ये शिकत असताना एरिक युआन यांची भेट शेरी यांच्याशी झाली होती. दोघे वेगवेगळ्या विद्यापीठांमध्ये शिकत होते आणि एकमेकांना भेटण्यासाठी त्यांना दर आठवड्याला १० तासांचा लांब रेल्वे प्रवास करावा लागत असे. हा दमवणारा प्रवास एरिक यांना अस्वस्थ करत होता. याच दरम्यान त्यांच्या मनात एक कल्पना आली: दूर असलेल्या लोकांना समोरासमोर असल्यासारखं जोडणारा एक प्लॅटफॉर्म तयार करायचा! कॉलेज संपल्यानंतरही हे स्वप्न एरिक यांच्या मनात कायम होतं.



अखेरीस, ते १९९७ मध्ये सिलिकॉन व्हॅलीत पोहोचले आणि WebEx कंपनीत रुजू झाले. विशेष म्हणजे, त्यांना अमेरिकेचा व्हिसा सलग ८ वेळा नाकारण्यात आला होता; पण त्यांनी हिंमत सोडली नाही. २००७ मध्ये थशलएु चं अधिग्रहण झाल्यावर ते 'सिस्को' मध्ये इंजिनिअरिंगचे उपाध्यक्ष बनले. येथे एरिक यांनी एक सोपी व्हिडीओ कॉलिंग सिस्टीम बनवण्याचा विचार मांडला; पण त्यांच्या कल्पनेला वारंवार टाळण्यात आलं. शेवटी, एरिक यांनी नोकरी सोडली आणि आपलं स्वप्न स्वतः पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. २०११ मध्ये एरिक युआन यांनी डररीलशश नावाच्या कंपनीची सुरुवात केली, ज्याचं नाव नंतर नो तळवशे'ऊोीपळलरींळेपी असं ठेवण्यात आलं. याचा उद्देश व्हिडीओ कनेक्शन इतकं सोपं करणं होतं की, कोणीही, कुठूनही, कोणत्याही अडथळ्याशिवाय एकमेकांशी बोलू शकेल.

२०१९ मध्ये 'झूम'चा IPO ( Initial Public Offering) आल्यानंतर कंपनीचं मूल्य सुमारे ९ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचलं. कोव्हिड-१९ महामारीनंतर 'झूम'ची लोकप्रियता गगनाला भिडली. केवळ दोन महिन्यांत वेब कॉन्फरन्सिंगची मागणी ४१८% ने वाढली आणि 'झूम' प्रत्येक घर, शाळा आणि कार्यालयाचा अविभाज्य भाग बनला. एरिक युआन यांचं म्हणणं आहे की, 'झूम' आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) मदतीने नवीन युगातील संवाद आणि सहकार्याची व्याख्या करेल. कंपनी युनिफाईड कम्युनिकेशन आणि ग्राहक अनुभव मार्केटमध्ये आपली पकड मजबूत करण्याच्या तयारीत आहे. आज 'झूम'ची बाजारपेठेतील किंमत (Market Cap) २३.५ अब्ज डॉलर इतकी आहे.

# फिरोदिया शिवाजियन्सच्या स्पर्धेत रिमझिम पावसात रंगला फुटबॉलचा थरार

## अशोकभाऊ फिरोदिया, आयकॉन आणि श्री साई स्कूलची दमदार कामगिरी

नगर – फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत ३० जुलै रोजी विविध वयोगटांतील अत्यंत रंगतदार आणि चुरशीचे सामने रंगले होते. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर रिमझिम पावसाच्या सरी कोसळत असतानाही खेळाडूंनी उत्साहात खेळ करत प्रेक्षकांची मने जिंकली. काही सामन्यांत गोलांचा अक्षरशः पाऊस पडला, तर काही सामने अखेरपर्यंत गोलशून्य राहिल्याने शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठा कायम राहिली.

स्पर्धेच्या सकाळच्या सत्रात १४ वर्षांखालील मुलांच्या गटात अशोकभाऊ फिरोदिया स्कूल आणि ऑक्झिलियम कॉन्व्हेंट यांच्यात सामना रंगला. दोन्ही संघांनी आक्रमक खेळ करत गोल करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. मात्र बचावफळीने उत्कृष्ट कामगिरी केल्याने एकाही संघाला गोल करता आला नाही. परिणामी हा सामना ०–० असा अनिर्णित राहिला.



फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत १६ वर्षांखालील मुलींच्या गटात आयकॉन स्कूल विरुध्द आर्मी (एम.आय.सी. अँड एस.) यांच्यात रंगलेला सामना.

१६ वर्षांखालील मुलांच्या गटात अशोकभाऊ फिरोदिया स्कूलने ऑक्झिलियम कॉन्व्हेंटवर ४–१ अशा फरकाने प्रभावी विजय मिळवला. सामन्याच्या तिसऱ्याच मिनिटाला आर्यन जाधवने गोल करत संघाचे खाते उघडले. त्यानंतर आयुष गाडलकरने २५, ३० आणि ५३ व्या मिनिटाला सलग तीन गोल करत हॅट्ट्रिकची नोंद केली. ऑक्झिलियम कॉन्व्हेंटला ५८ व्या मिनिटाला श्रीराम बल्लाळच्या सेल्फ गोलमुळे एकमेव गोल मिळाला. मात्र अशोकभाऊ फिरोदिया स्कूलच्या आक्रमक खेळापुढे त्यांना टिकाव धरता आला नाही.

१६ वर्षांखालील मुलींच्या गटात आयकॉन स्कूलने आर्मी (एम.आय.सी. अँड एस.) स्कूलवर २–० असा विजय मिळवला. आयकॉन स्कूलकडून वैष्णवी जगतापने १३ व्या मिनिटाला, तर गौरी आचार्याने २८ व्या मिनिटाला गोल करत संघाला भक्कम आघाडी मिळवून दिली. बचावफळीनेही तितकाच उत्कृष्ट खेळ करत आर्मी स्कूलला एकही गोल करू दिला नाही.

दुपारच्या सत्रात याच गटातील दुसऱ्या सामन्यात श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूलने ऊर्जा गुरुकुलवर २–० असा विजय मिळवला. श्री साई स्कूलकडून हृदया तडकेने २३ व्या मिनिटाला, तर तनुजा गुंजाळने २८ व्या मिनिटाला गोल करत संघाचा विजय निश्चित केला. संपूर्ण सामन्यात श्री साई स्कूलने वर्चस्व राखत प्रतिस्पर्धी संघाला गोल करण्याची कोणतीही संधी दिली नाही.

१२ वर्षांखालील मुलांच्या गटात आठरे पाटील स्कूल आणि आयकॉन स्कूल यांच्यात झालेला सामना अत्यंत अटीतटीचा ठरला. दोन्ही संघांनी सातत्याने आक्रमणे केली, मात्र एकाही संघाला गोल करता आला नाही. त्यामुळे हा सामना ०–० असा अनिर्णित राहिला.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात मात्र आठरे पाटील स्कूलने आयकॉन स्कूलवर तब्बल ८–१ असा दणदणीत विजय मिळवत स्पर्धेतील सर्वात मोठ्या विजयांपैकी एक नोंदवला. अलख वराळने १७ व्या मिनिटाला पहिला गोल करत संघाचे खाते उघडले. त्यानंतर वेदांत ससे या खेळाडूने २०, २३, ४२, ४५ आणि ४८ व्या मिनिटाला तब्बल पाच गोल झळकावत अप्रतिम खेळाचे दर्शन घडवले. याशिवाय साई धामणेने २५ व्या मिनिटाला आणि कृष्णा घोरपडेने ३२ व्या मिनिटाला प्रत्येकी एक गोल केला. आयकॉन स्कूलला प्रतिक पवारच्या सेल्फ गोलमुळे एकमेव गोल मिळाला. आठरे पाटील स्कूलच्या वेगवान आणि आक्रमक खेळीपुढे आयकॉन स्कूलचा बचाव पूर्णपणे निष्प्रभ ठरला.

१६ वर्षांखालील मुलांच्या गटातील आठरे पाटील स्कूल आणि आयकॉन स्कूल यांच्यातील सामना देखील शेवटपर्यंत चुरशीचा झाला. दोन्ही संघांनी विजयासाठी जोरदार प्रयत्न केले. मात्र दोन्ही बाजूंच्या बचावफळीने उत्कृष्ट कामगिरी करत एकही गोल होऊ दिला नाही. परिणामी हा सामना ०–० असा अनिर्णित राहिला.



## गुरुवाणी – ५
## इतिहास कधीही विसरू नका

जो समाज आपला इतिहास विसरतो, त्या समाजाला वर्तमान आणि भविष्यही नसते. इतिहास आपले पॉवर हाऊस असते. आजचा दिवस सर्वांना इतिहास समजून घेण्याचा दिवस आहे. सुमारे दीडशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रात विविध ठिकाणी जैन समाज होता पण एकही जैन संत नव्हता. महाराष्ट्रात राजस्थानी जैन दहाव्या शतकापासून आहेत. पण जवळपास ८०० वर्षे धर्मगुरू नसताना आपले पूर्वज महाराष्ट्रात वास्तव्य करत होते. मारवाड, मालवा प्रांतात धर्मगुरू, संत होते. पण त्यांना इथे यायचा रस्ता नव्हता. घोडनदी येथील लोढा यांनी मारवाडला जाऊन संतांना विनंती केली. त्यांना नकारच मिळाला. त्यावेळी पूज्य तिलोकऋषीजी म.सा. महाराष्ट्रात यायला तयार झाले. त्याकाळात ऋषी परंपरेत काव्य रचना, गीत रचनेला स्थान नव्हते. कारण काव्यात खोटे लिहिले जाते. हे खोटं संतांना अमान्य होते. सुराणा कुलातील पूज्य तिलोकऋषीजी म.सा. यांनी आई दीक्षा घेत होती म्हणून स्वतःही श्रद्धेने वयाच्या दहाव्या वर्षी दीक्षा घेतली. विक्रम संवत १९१४ मध्ये रतलाम येथे सुराणा कुलातील चौघांनी दीक्षा घेतली होती. मनुष्य इतर प्राण्यांपेक्षा वेगळा आहे कारण तो जे शक्य नाही ते करण्यासाठी मेहनत घेतो. जीवनात जो थांबतो तो संपतो. आपल्याला पाण्यासारखे प्रवाही राहिलं पाहिजे. पूज्य तिलोकऋषीजी म.सा. यांना काव्य स्फूरत होते पण गुरूंकडून त्यांना नकार दिला जात होता. पण त्यांनी हार मानली नाही. त्यांनी दोष विरहित काव्य रचनेसाठी परवानगी मागितली. गुरूंनीही विश्वासाने त्यांना काव्य रचनेसाठी आशीर्वाद दिले. पुढे इतिहास घडला. पूज्य तिलोकऋषीजी यांनी घोडनदी येथील श्रावक लोढा यांची विनंती मान्य केली. विक्रम संवत १९३६ च्या चातुर्मासासाठी पूज्य तिलोकऋषीजी म.सा. घोडनदी येथे दाखल झाले. या दरम्यान ते अहिल्यानगर येथे आले होते. आज भारतभरात सर्व जैन संप्रदायात त्यांनी रचलेले काव्य गायले जाते. असे कवी कुलभूषण महाराष्ट्रात आले नसते तर आपण कोणीच नसतो. महाराष्ट्रासह संपूर्ण दक्षिण भारत कायम त्यांचा ऋणी आहे आणि राहील. माझे गुरू आचार्यश्रींचे ते गुरूदेव होते, याचा खूप अभिमान वाटतो. त्यांनी निर्माण केलेल्या मार्गावर आज समाज मार्गक्रमण करत आहे. सन १९३७ मध्ये त्यांनी अहिल्यानगरला पहिला चातुर्मास केला. वांबोरीतही त्यांचा चातुर्मास झाला. आज त्यांची १४० वी पुण्यतिथी आहे. त्यांच्या कार्यापासून कायम प्रेरणा मिळते.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**



आनंदऋषीजी योगा सेंटरमध्ये आयोजित गुरुपौर्णिमा उत्सवात सहभागी मान्यवर.

# आनंदऋषीजी योगा सेंटरमध्ये गुरुपौर्णिमा साजरी

नगर – आनंदऋषीजी योगा सेंटर मध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी अहिल्यानगर महानगरपालिकेचे माजी कार्यकारी अभियंता एन. डी. कुलकर्णी होते तर अनिल मेहरे, सौ. अर्चना मेहरे, केशव खानदेशी, रमेश बोरा, सौ. सुरेखा लोमटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

योगाचे जीवनातील महत्व हे अनेक संत व महापुरुष यांच्या जीवनशैली सांगून स्पष्ट केले. आपल्या जीवनाची कुंडली जागृत करण्यासाठी वज्रासनाचे महत्व अध्यक्षीय भाषणातून श्री. कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

'हेल्थ इज वेल्थ' या संकल्पनेतून योगाचे आयुष्यातील महत्व ॲडजस्टमेंट करून अनेक उदाहरणातून योगगुरु अनिल मेहरे यांनी सांगितले. केशव खानदेशी व रमेश बोरा यांनी 'जीवनात कसा आनंद घ्यावा' हे स्पष्ट केले.

कार्यक्रमाची सुरुवात सौ. हेमलता पडोळे व सुनिल महाजन यांनी स्वागत गीताने केली. गुरुष्टुती सौ. भावना मेहरे यांनी गायली. गुरुवर्यांचे पाद्यपूजन श्री व सौ. उज्वला दिपक नवले यांनी विधिवत केले. तर सतिश पडोळे यांनी आभार मानले. जगन्नाथ कांबळे, सौ. शकुंतला खेरे यांनी विचार व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी राजेंद्र सिकची, सौ. शकुंतला खेरे, राजीव भळगट, चंदूशेठ शिंगी, ताराचंद जाधव, प्रकाश गांधी, किशोर सुराणा, अनिल पोखरणा, अनिल लोढा, संतोष कुलकर्णी, बापूसाहेब डावरे, विनोद घोडेकर यांनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन सौ. निता जाधव व जगन्नाथ कांबळे यांनी केले.

# 'पराक्रम दिना'निमित्त राज्यस्तरीय निबंध, वक्तृत्व व रिल्स स्पर्धांचे आयोजन

नगर – थोरले बाजीराव पेशवे यांच्या जयंतीनिमित्त १८ ऑगस्ट हा दिवस राज्यभरात 'पराक्रम दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्यांच्या शौर्याचा, पराक्रमाचा व राष्ट्रनिष्ठेचा परिचय नव्या पिढीला व्हावा, या उद्देशाने १ ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राज्यस्तरीय निबंध, वक्तृत्व व रिल्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)चे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

स्पर्धांच्या नियोजनासाठी इतिहास तज्ज्ञ व अभ्यासकांचा समावेश असलेली 'पराक्रम दिन समिती' स्थापन करण्यात आली आहे. समितीमध्ये काकासाहेब विधाते, पांडुरंग बलकवडे, जगन्नाथ लडकत, मोहन शेटे, मंगेश खाडिलकर आणि कौमुदी परांजपे यांचा समावेश आहे.

या उपक्रमांतर्गत शालेय, महाविद्यालयीन व खुल्या गटासाठी निबंध व वक्तृत्व स्पर्धा, तर महाविद्यालयीन व खुल्या गटासाठी रिल्स स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

निबंध स्पर्धेसाठी जास्तीत जास्त १,००० शब्दांची मर्यादा असून मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत टंकलिखित निबंधाची झऊ्रऋ फाइल अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करावी. निबंधासाठी आवश्यक संदर्भ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या संदर्भ साहित्यावर आधारित असावेत. बक्षीसपात्र निबंधांबाबत परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

वक्तृत्व स्पर्धेसाठी स्पर्धकांनी स्वतःच्या मूळ व स्पष्ट आवाजातील जास्तीत जास्त सात मिनिटांचा व्हिडिओ सादर करावयाचा आहे. व्हिडिओमध्ये कोणतेही एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) आधारित तंत्रज्ञान, साऊंड इफेक्ट्स किंवा व्हिज्युअल इफेक्ट्स वापरता येणार नाहीत. उत्तम गुणवत्तेचा व्हिडिओ तयार करून तो 'अमृत पराक्रम दिन'च्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करावा. बक्षीसपात्र वक्तृत्व सादरीकरणाबाबत परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

स्पर्धांचे स्वरूप, विषय, बक्षिसे व अधिकृत नियमावली https://parakramdin.mahaamrut.org.in/ या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच थोरले बाजीराव पेशवे यांच्याशी संबंधित निवडक संदर्भ पुस्तकांची यादी, त्यांच्या जीवनप्रवासाचे सोप्या व संक्षिप्त स्वरूपातील ई–बुक आणि त्याच ई–बुकच्या आधारे तयार करण्यात आलेली प्रश्नावलीही संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सर्व शाळा, महाविद्यालये तसेच इच्छुकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन विजय जोशी यांनी केले आहे.

# बलात्कार व ॲट्रॉसिटी प्रकरणातील आरोपीची विशेष न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता

नगर – बलात्कार, अनैसर्गिक कृत्य, शिवीगाळ, धमकी तसेच अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यातील आरोपी साहिल मोहम्मद शाकीर सय्यद (रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) याची विशेष न्यायालयाने पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली.

या प्रकरणात ३ मार्च २०२३ रोजी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर या प्रकरणाची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायालयातील विशेष न्यायालयात झाली. सुनावणी दरम्यान दोन्ही बाजूंचा युक्तिवाद, साक्षीदारांचे जबाब तसेच उपलब्ध कागदोपत्री पुरावे यांचा विचार करून न्यायालयाने आरोपीविरुद्धचे आरोप संशयाच्या पलीकडे सिद्ध झाले नसल्याचे नमूद करत साहिल मोहम्मद शाकीर सय्यद यांची निर्दोष मुक्तता केली.या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. सतीशचंद्र सुद्रीक यांनी प्रभावीपणे बाजू मांडली.

# अशोकचक्राच्या संविधानिक नैतिकतेतून जातिनिर्मूलनाचा एल्गार

## ८ ऑगस्टपासून 'तिरंगा सत्याग्रह'; 'पीपल्स हेल्पलाईन' आणि 'भारतीय जनसंसद'चा पुढाकार; 'जातिनिर्मूलनासाठी केली जाणार भारतीयांमध्ये जागृती : ॲड. कारभारी गवळी



नगर – भारतीय संसदीय लोकशाहीला व्यक्तिपूजा, घराणेशाही, जातीय व धार्मिक ध्रुवीकरण, धनशक्ती, भ्रष्टाचार आणि निष्क्रिय नोकरशाहीच्या विळख्यातून मुक्त करण्याच्या उद्देशाने ८ ऑगस्टपासून देशभर 'जंतर–मंतर क्रांती दिवस' पाळून 'तिरंगा सत्याग्रह' सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा 'पीपल्स हेल्पलाईन' आणि 'भारतीय जनसंसद'च्या वतीने करण्यात आली आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून संविधाननिष्ठ लोकशाही, सामाजिक समता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकाभिमुख प्रशासन याबाबत व्यापक जनजागृती केली जाणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

ॲड. गवळी यांनी सांगितले, तिरंगा हा केवळ राष्ट्रध्वज नसून भारतीय लोकशाहीची मूल्यव्यवस्था आणि संविधानिक तत्त्वज्ञानाचे प्रभावी प्रतीक आहे. तिरंग्याचा मूळ सन्मान आणि स्वरूप अबाधित ठेवून त्यातील प्रत्येक रंगामागील लोककल्याणकारी मूल्ये समाजात रुजविण्याचा प्रयत्न या सत्याग्रहातून केला जाणार आहे.

तिरंग्यातील रंगांची नव्या दृष्टिकोनातून मांडणी करुन तिरंगा सत्याग्रहाच्या माध्यमातून राष्ट्रध्वजातील रंगांना विशिष्ट लोकशाही मूल्यांशी जोडण्यात आले आहे. केशरी रंग लोकभक्ती : केवळ मानवकल्याण नव्हे, तर संपूर्ण जीवसृष्टी, पर्यावरण आणि निसर्गसंवर्धनाची बांधिलकी. पांढरा रंग ज्ञानभक्ती : अद्ययावत ज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकनिष्ठ विचार आणि पारदर्शक निर्णयप्रक्रिया. हिरवा रंग कर्मभक्ती : प्रत्यक्ष, प्रामाणिक, जबाबदार आणि परिणामकारक लोकसेवा. अशोकचक्र संविधानिक नैतिकता : कायद्याचे राज्य, समानता, सामाजिक न्याय, जातिनिर्मूलन आणि लोकशाही मूल्यांचे अखंड प्रतीक.

ॲड. गवळी यांनी स्पष्ट केले की, अशोकचक्र हे केवळ राष्ट्रध्वजाच्या मध्यभागी असलेले निळे चक्र नसून, ते संविधानिक मूल्यांचे सतत स्मरण करून देणारे न्यायचक्र आहे. लोकभक्ती संविधानाशिवाय भावनिक लोकानुनयात, ज्ञानभक्ती लोकशाही नियंत्रणाशिवाय तंत्रशाहीत (Technocracy) आणि कर्मभक्ती कायद्याच्या चौकटीशिवाय मनमानीत रूपांतरित होऊ शकते. त्यामुळे अशोकचक्राचे अखंड फिरणे म्हणजे सत्ता, प्रशासन आणि समाजावर संविधानिक नैतिकतेचे सातत्याने नियंत्रण राहणे होय.

तिरंगा सत्याग्रहाच्या संकल्पनेमागील विचार स्पष्ट करताना ॲड. गवळी म्हणाले, मानसशास्त्रज्ञ कार्ल युंग यांच्या प्रतीकसिद्धांतानुसार प्रभावी प्रतीके मानवी चेतना, भावना आणि सामूहिक वर्तनावर परिणाम घडवू शकतात. त्याच दृष्टिकोनातून तिरंगा हा भारतीयांच्या भावनिक चेतनेला संविधाननिष्ठ, विवेकाधिष्ठित आणि लोकशाही मूल्यांकडे प्रेरित करणारा राष्ट्रीय प्रेरणास्रोत ठरू शकतो.

या तिरंगा सत्याग्रहाचा केंद्रबिंदू जातिनिर्मूलन असणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जन्माधारित उच्च–नीचता, अस्पृश्यता, जातीय बहिष्कार आणि सामाजिक वर्चस्व या प्रवृत्ती संविधानाच्या समानतेच्या तत्त्वाशी विसंगत असल्याचे त्यांनी नमूद केले. याबाबत बोलताना ॲड. गवळी म्हणाले, अशोकचक्र हे जन्माधारित विषमतेवर अखंड फिरणारे संविधानिक न्यायचक्र आहे. जातिव्यवस्था टिकविणारी लोकशाही ही पूर्ण लोकशाही असू शकत नाही. सामाजिक समता आणि संविधानिक न्यायाशिवाय लोकशाहीची संकल्पना अपुरी राहते. हा तिरंगा सत्याग्रह कोणत्याही एका राजकीय पक्षासाठी, विचारसरणीसाठी किंवा उमेदवारासाठी नसल्याचे स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, हा उपक्रम प्रत्येक लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि नागरिकाच्या लोकशाही जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. सार्वजनिक जीवनात लोककल्याणाचे ध्येय, ज्ञानाधिष्ठित विवेक, प्रामाणिक लोकसेवा आणि संविधाननिष्ठ आचरण हेच नेतृत्वाचे खरे निकष असावेत, हा संदेश देशभर पोहोचविण्यासाठी ८ ऑगस्टपासून व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याचे ॲड. गवळी यांनी सांगितले. या सत्याग्रहासाठी अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी यांच्यासह अनेक कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

# सरपंच शरद पवार यांना उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर



नगर – नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील गावचे सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे नगर तालुकाध्यक्ष शरद खंडेराव पवार यांना कथित अपहरण, मारहाण व खंडणी प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणातील यापूर्वी दोन आरोपींना अटकपूर्व जामीन, तर एका आरोपीला सत्र न्यायालयातून नियमित जामीन मिळाला होता.

या प्रकरणात शरद पवार यांच्यासह चार जणांविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी किशोर महादेव परभने (रा. बांधखेल, ता. आष्टी, जि. बीड) यांनी खासदार निलेश लंके यांच्याविषयी गंभीर स्वरूपाची सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याच्या कारणावरून पुणे येथून आपले अपहरण करण्यात आले, मारहाण करण्यात आली आणि खंडणीची मागणी करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत केला होता.

या गुन्ह्यानंतर शरद पवार हे सुमारे अडीच महिन्यांपासून न्यायालयीन कोठडीत होते.यापूर्वी १२ जून रोजी अहिल्यानगर जिल्हा व सत्र न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळला होता. त्यानंतर १७ जून रोजी त्यांनी संभाजीनगर खंडपीठात जामीनासाठी अर्ज दाखल केला. न्यायमूर्ती वाघवसे यांच्या न्यायासनासमोर या अर्जावर ७ सुनावण्या झाल्यानंतर दोन्ही बाजूंचा प्रखर युक्तिवाद ऐकून न्यायालयाने जामीन मंजूर केला.

सुनावणीदरम्यान बचाव पक्षाचे वकील ॲड. नागरगोजे आणि ॲड. सत्यजित पवार यांनी फिर्यादीने कथित घटना घडल्यानंतर तब्बल तीन महिन्यांनी गुन्हा दाखल केल्याने न्यायालयाचे लक्ष वेधले. तसेच कथित अपहरण, मारहाण व खंडणीच्या आरोपांना आधार देणारे पुरावे अपुरे असल्याचा दावा त्यांनी केला. या प्रकरणात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय पुरावे, कथित खंडणीची देवाणघेवाण किंवा इतर भौतिक पुरावे उपलब्ध नसल्याचा युक्तिवादही त्यांनी न्यायालयात मांडला. बचाव पक्षाने फिर्यादीने यापूर्वी शरद पवार यांच्याविरोधात धमकी दिल्याची तक्रार पोलीस ठाण्यात करण्यात आल्याचा तसेच या संपूर्ण प्रकरणामागे राजकीय हेतू असल्याचा दावा देखील न्यायालयासमोर मांडला. दरम्यान, न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद विचारात घेत शरद पवार यांना जामीन मंजूर केला.

जामीन मंजूर झाल्यानंतर सरपंच शरद पवार यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, हा गुन्हा राजकीय हेतूने आणि बदनामी करण्याच्या उद्देशाने दाखल करण्यात आला आहे. न्यायव्यवस्थेवर आमचा पूर्ण विश्वास होता आणि आज तो सार्थ ठरला. सत्याचा विजय झाला आहे.

# भारतीय शिक्षणपद्धती आणि वाढती बेरोजगारी चिंताजनक

भारतात शिक्षण हा यशाचा सर्वात मोठा मार्ग मानला जातो. परंतु इतर देशात विद्यार्थ्यांची आवड विचारात घेऊन त्यांच्या आवडीनुसार शिक्षण दिल्या जाते. त्यामुळे इतर देशांनी केवळ शिक्षणाच्या बळावर आपला सर्वांगीन विकास साधला आहे. परंतु आपल्या देशातील शिक्षणपद्धती ही सक्तीची आहे. ज्यामुळे शिक्षण विभागाने ठरविलेले विषय हे विद्यार्थ्यांना घ्यावेच लागते. मग त्या विषयात रस असो किंवा नसो. यामुळे त्यांच्यातील सुप्त गुणांचा ऱ्हास होतो. शिक्षण आणि बेरोजगारीचा संबंध हा एक गुंतागुंतीचा मुद्दा आहे जो कोणत्याही देशाच्या सामाजिक आणि आर्थिक रचनेवर परिणाम करतो. एका बाजूला शिक्षणाला चांगल्या रोजगाराच्या संधींचे प्रवेशद्वार मानले जाते, तर दुसऱ्या बाजूला सुशिक्षित तरुणांमधील वाढती बेरोजगारी ही एक गंभीर चिंतेची बाब बनत चालली आहे.

अलीकडच्या वर्षांत भारत आणि जगाच्या अनेक भागांमध्ये सुशिक्षित बेरोजगारी एक मोठे आवाहन म्हणून उदयास आली आहे. याचा अर्थ असा की, उच्च शिक्षण घेऊनही मोठ्या संख्येने तरुण नोकरी शोधण्यात असमर्थ आहेत. ही परिस्थिती केवळ वैयक्तिक निराशेचे कारण बनत नाही, तर राष्ट्रीय विकासातही अडथळा आणते. बेरोजगारीची अनेक कारणे असली तरीही विद्यापीठे अनेकदा बाजारात मागणी असलेली कौशल्ये शिकवत नाहीत. अनेक शिक्षण संस्थांमध्ये शिक्षणाचा दर्जा खालावलेला आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना पुरेसे ज्ञान आणि कौशल्ये मिळत नाहीत. कौशल्य अंतराची समस्या आजचा बाजार वेगाने बदलत आहे आणि नवीन कौशल्यांची मागणी करत आहे. आपली शिक्षण प्रणाली अनेकदा या बदलत्या गरजांशी जुळवून घेत नाही. केवळ पदवी मिळवणे पुरेसे नाही; दर्जेदार शिक्षण महत्त्वाचे आहे. कमकुवत अभ्यासक्रम, अप्रशिक्षित शिक्षक आणि जुन्या शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक रोजगार बाजारासाठी तयार करत नाहीत. ही एक अशी समस्या आहे जी सुशिक्षित बेरोजगारीला आणखी वाढवते. भारत हा जगातील सर्वात मोठ्या तरुण लोकसंख्येपैकी एक आहे, ज्याला अनेकदा 'लोकसंख्याशास्त्रीय लाभांश' म्हणून गौरवले जाते. तरीही एक विरोधाभास आहे. भारत दरवर्षी लाखो अभियंते, एमबीए आणि पदवीधर तयार करतो, पण बेरोजगारीचा दर मात्र कमी करू शकत नाही. शिक्षण आणि रोजगार यांच्यातील वाढत्या दरीमुळे एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो: आपण आपल्या विद्यार्थ्यांना बाजारपेठेला आवश्यक असलेली कौशल्ये देत आहोत का?

आजची शिक्षणपद्धती आणि वाढती बेरोजगारी यांच्यात गंभीर विसंगती निर्माण झाली असून पदवीधर तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. पारंपारिक ज्ञान देणारी शिक्षणप्रणाली, प्रात्यक्षिक कौशल्यांचा अभाव आणि उद्योगांच्या बदलत्या गरजा या प्रमुख समस्या आहेत. प्रात्यक्षिक व कृतीशील शिक्षणाऐवजी केवळ पाठमोरे आणि पदवी मिळवण्यापुरते शिक्षण, कौशल्यांची तफावत, बाजारातील मागणीनुसार आवश्यक असणारे तांत्रिक व संवादात्मक कौशल्ये विद्यार्थ्यांकडे नसतात. ज्यामुळे पदवीधर तरुणांना सामावून घेणारे उद्योग व सेवा क्षेत्रातील नवीन संधी अपुऱ्या पडत आहेत.

एवढेच नव्हे तर गेल्या काही वर्षांत शिक्षणाचा खर्च झपाट्याने वाढत असताना उच्चशिक्षित तरुणांमध्ये बेरोजगारी ही चिंताजनक पातळीवर पोहोचली आहे. त्यामुळे लाखो रुपये खर्च करून पदवी किंवा व्यावसायिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना अपेक्षित नोकरी मिळत नसल्याचे चित्र समोर आले आहे. शिक्षणाचा वाढता खर्च, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि कौशल्यांतील तफावत यामुळे विद्यार्थी आणि पालक दोघांवरही आर्थिक व मानसिक ताण वाढत असल्याचे विविध अहवाल आणि तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

आज केवळ शाळा किंवा महाविद्यालयाची फी भरून शिक्षण पूर्ण होत नाही. शिकवण्या, स्पर्धा परीक्षा कोचिंग, डिजिटल उपकरणे, इंटरनेट, वाहतूक, गणवेश, पुस्तके, प्रोजेक्ट, वसतिगृह आणि इतर उपक्रमांवरही मोठा खर्च करावा लागतो. अनेक मध्यम वर्गीय कुटुंबांसाठी मुलांच्या शिक्षणाचा खर्च हा घर खरेदी किंवा इतर मोठ्या आर्थिक जबाबदाऱ्यांइतकाच महत्त्वाचा बनला आहे. परिणामी अनेक पालक आपली बचत मोडतात, कर्ज घेतात किंवा इतर गरजा पुढे ढकलून मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देतात.

उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असली तरी त्याच प्रमाणात दर्जेदार रोजगार निर्माण होत नसल्याचे अहवालातून स्पष्ट होत आहे. अनेक पदवीधर महिनोनमहिने नोकरीच्या शोधात असतात. काहींना त्यांच्या शिक्षणाशी संबंधित नसलेल्या क्षेत्रात कमी पगारावर काम स्वीकारावे लागते, तर काही जण स्पर्धा परीक्षा किंवा सरकारी नोकरीच्या तयारीत अनेक वर्षे घालवतात. यामुळे शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही आर्थिक स्वावलंबन लांबणीवर पडत असल्याचे दिसून येते.

देशाचा एकूण बेरोजगारी दर तुलनेने नियंत्रित असला तरी तरुणांमधील बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे. विशेषतः १८ ते २९ वर्षे वयोगटातील युवक–युवतींना शिक्षण पूर्ण झाल्यानंतर योग्य रोजगार मिळवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. रोजगार, शिक्षण किंवा कौशल्य प्रशिक्षण या तिन्हींपासून दूर राहणाऱ्या तरुणांची संख्याही चिंतेचा विषय ठरत आहे. ही परिस्थिती देशाच्या लोकसंख्यात्मक लाभालाही आवाहन ठरू शकते हे नाकारता येत नाही. उद्योगांना आवश्यक असलेली कौशल्ये आणि शिक्षण संस्थांमधून मिळणारे प्रशिक्षण यामध्ये अनेकदा मोठी दरी दिसून येते. अनेक कंपन्या उमेदवारांकडे पदवी असली तरी व्यावहारिक कौशल्ये, संवाद क्षमता, डिजिटल ज्ञान किंवा उद्योगानुसार आवश्यक अनुभव नसल्याची तक्रार पुढे करतात. त्यामुळे पदवीधरांची संख्या वाढली असली तरी रोजगारक्षम उमेदवारांचे प्रमाण अपेक्षेइतके वाढलेले नाही. कौशल्याधारित शिक्षण, इंटर्नशिप आणि उद्योग–संस्थांमधील समन्वय वाढवण्याची गरज आज निर्माण झाली आहे. या गरजेकडे वेळीच लक्ष दिले नाही, तर वाढती बेरोजगारी उग्र रुप धारण करेल हे निश्चित आहे. शिक्षणासाठी घेतलेले कर्ज, वाढत्या फी आणि नोकरीबाबतची अनिश्चितता यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक दबाव वाढत आहे. दुसरीकडे, विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा, अपेक्षा आणि करिअरची चिंता वाढल्याने मानसिक ताणही मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. शिक्षणावर केलेली मोठी गुंतवणूक अपेक्षित परिणाम देत नसल्यास निराशा वाढू शकते. त्यामुळे शिक्षणासोबत करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम यांवर भर देण्याची आवश्यकता अधोरेखित होत आहे.

शिक्षणव्यवस्था आणि रोजगार बाजार यांच्यात अधिक सुसंगती निर्माण करणे ही काळाची गरज आहे. उद्योगांच्या गरजांनुसार अभ्यासक्रम अद्ययावत करणे, कौशल्याधारित प्रशिक्षण वाढवणे, इंटर्नशिपला प्रोत्साहन देणे, नवउद्योजकतेसाठी अनुकूल वातावरण तयार करणे आणि अधिक दर्जेदार रोजगार निर्माण करणे यावर भर दिल्यास परिस्थितीत सुधारणा होऊ शकते. शिक्षण हे केवळ पदवी मिळवण्याचे साधन न राहता रोजगारक्षम कौशल्ये विकसित करणारी प्रक्रिया बनल्यास तरुणांना अधिक चांगल्या संधी उपलब्ध होऊ शकतील यात काही दुमत नाही.

**लेखक – सुनील शिरपुरे**

